भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०००

**( २००० चा अधिनियम क्रमांक ५६ )**

[ १७ एप्रिल, २००६ रोजी यथाविद्यमान]

# The Juvenile Justice (Care and Protection of Children) Act, 2000

**(Act No. 56 of 2000)**

[As in force on the 17th April, 2006]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००४ यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००७

**[ किंमत : रुपये १६.०० ]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १७ एप्रिल, २००६ रोजी यथाविद्यमान असलेला दि जुवेनाइल जस्टीस (केअर अँण्ड प्रोटेक्शन) अॅक्ट, २००० याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १५, अंक १, दिनांक १ जून, २००६ यात पृष्ठे ३ ते २० मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्रधिकृत पाठ (केंद्रीय बिधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक १ जून २००६.

**टी. के. विश्वनाथन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Juvenile Justice (Care and Protection) Act, 2000 as on the contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 15, dated 1st June, 2006 on pages 3 to 20.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi.
Date 1st June 2006.

T. K. VISWANATHAN,
Secretary to the Government of India.

# बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० 

## कलमांचा क्रम

कलमे

### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. व्याख्या.
३. एखाद्या बालक न राहिलेल्या बालकाच्या बाबतीत चौकशी चालू ठेवणे.

### प्रकरण दोन

### कायद्याशी संघर्ष करीत असलेले बालक

४. बाल न्याय मंडळ.
५. मंडळाच्या संबंधातील कार्यपद्धती, इत्यादी.
६. बाल न्याय मंडळाचा अधिकार.
७. या अधिनियमान्वये अधिकार प्रदान करण्यात न आलेल्या दंडाधिकाऱ्याने अनुसरावयाची कार्यपद्धती.
८. अभीक्षण गृहे.
९. विशेष गृहे.
१०. कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकाला ताब्यात घेणे.
११. अभिरक्षकाचे बालकावरील नियंत्रण.
१२. बालकाचा जामीन.
१३. माता-पित्यास किंवा पालकास किंवा परिवीक्षा अधिकाऱ्यास माहिती देणे.
१४. बालकाच्या संबंधात मंडळाकडून चौकशी.
१५. बालकाच्या संबंधात देता येतील असे आदेश.
१६. बालकाविरुद्ध न द्यावयाचे आदेश.
१७. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या प्रकरण आठ खालील कार्यवाही बालकाविरुद्ध सक्षम असणार नाही.
१८. बालकाची आणि बालक नसलेल्या व्यक्तीची कार्यवाही संयुक्तपणे होणार नाही.
१९. दोष सिद्ध झाल्यामुळे येणाऱ्या निरर्हतेचे निरसन.
२०. प्रलंबित खटल्याच्या बाबतीतील विशेष तरतूद.
२१. या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत गुंतलेल्या बालकांची नावे, इत्यादी प्रकाशित करण्यास मनाई.
२२. निसटलेल्या बालकांच्या संबंधातील तरतूद.
२३. बालकाला किंवा मुलाला क्रूरपणे वागविण्याबद्दल शिक्षा.
२४. भीक मागण्याच्या कामासाठी बालकाला किंवा मुलाला राबविणे.
२५. कोणत्याही बालकाला किंवा मुलाला मादक मद्य किंवा अंमली औषधिद्रव्ये किंवा मन:प्रभावी पदार्थ देण्याबद्दल शास्ती.
२६. बालक किंवा मूल कर्मचाऱ्यांचे शोषण.
२७. विशेष अपराध.
२८. पर्यायी शिक्षा.

### प्रकरण तीन

### काळजी घेण्याची व संरक्षणाची गरज असलेले मूल

२९. बाल-कल्याण समिती.
३०. समितीच्या संबंधातील कार्यपद्धती, इत्यादी.
३१. समितीचे अधिकार.
३२. समितीपुढे हजर करणे.
३३. चौकशी.
३४. बालगृहे.
३५. निरीक्षण.
३६. सामाजिक लेखापरीक्षण.
३७. निवारागृहे.
३८. हस्तांतरण.
३९. पुन:स्थापना.

## प्रकरण चार

**कलमे** **पुनर्वसन आणि सामाजिक पुनरेकात्मीकरण**

४०. पुनर्वसन आणि सामाजिक पुनरेकात्मीकरणाची प्रक्रिया.
४१. दत्तकग्रहण.
४२. बालक संगोपन.
४३. पुरस्कृत करणे.
४४. अनुरक्षण संघटना.
४५. सांगड घालणे आणि समन्वय साधणे.

## प्रकरण पाच

**संकीर्ण**

४६. बालकाच्या किंवा मुलाच्या माता-पित्याची अथवा पालकाची उपस्थिती.
४७. बालकाच्या किंवा मुलाच्या उपस्थितीशिवाय भागविणे.
४८. घातक रोगाने ग्रस्त असलेल्या बालकाची किंवा मुलाची मान्यताप्राप्त ठिकाणी रवानगी आणि त्याची पुढील व्यवस्था.
४९. वयाचा तर्क बांधणे आणि ते निश्चित करणे.
५०. एखाद्या बालकाला किंवा मुलाला अधिकारितेबाहेर पाठविणे.
५१. अहवाल गोपनीय समजले जाणे.
५२. अपीले.
५३. पुनरीक्षण.
५४. चौकशी, अपीले आणि पुनरीक्षण कार्यवाही या संबंधीतील कार्यपद्धती.
५५. आदेशात सुधारणा करण्याचा अधिकार.
५६. बालकाला किंवा मुलाला विनादोषारोप सोडण्याचा आणि स्थानांतरित करण्याचा सक्षम प्राधिकरणाचा अधिकार.
५७. या अधिनियमाखालील बालगृहे आणि भारताच्या निरनिराळ्या भागातील तशाच स्वरूपाची बालगृहे यांच्यातील स्थानांतरण.
५८. विकल मनाच्या किंवा कुष्ठरोग पीडित किंवा अंमली पदार्थांचे व्यसन जडलेल्या बालकाचे किंवा मुलाचे स्थानांतरण.
५९. बालकास किंवा मुलास ठेवण्याचे स्थान निश्चित झाल्यावर त्यास सोडून देणे किंवा त्याची अनुपस्थिती.
६०. माता-पित्यांकडून अंशदान.
६१. निधी.
६२. केंद्रीय राज्य, जिल्हा आणि शहर सल्लागार मंडळे.
६३. बालकांसाठी विशेष पोलीस पथक.
६४. या अधिनियमाच्या प्रारंभी शिक्षा भोगत असलेले कायद्याशी संघर्ष करीत असलेले बालक.
६५. बंधपत्रांसंबंधीची कार्यपद्धती.
६६. अधिकारांचे प्रत्यायोजन.
६७. सद्भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.
६८. नियम करण्याचा अधिकार.
६९. निरसन व व्यावृत्ती.
७०. अडचणी दूर करण्याचा अधिकार.

# बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०००

**(२००० चा अधिनियम क्रमांक ५६)**

[१७ एप्रिल, २००६ रोजी यथाविद्यमान]

[३० डिसेंबर, २०००]

**कायद्याशी संघर्ष करणारी बालके आणि काळजी घेण्याची व संरक्षणाची गरज असलेली मुले यांच्यासाठी योग्य ती काळजी, संरक्षण व उपचार यांची तरतूद करून, त्यांच्या विकासविषयक गरजा पुरवून आणि त्यांच्या संबंधातील प्रकरणांचा निवाडा करताना व ती निकालात काढताना मुलांचे हितसंबंध जास्तीत जास्त जपले जाण्यासाठी त्यांच्याशी मैत्रीपूर्ण दृष्टिकोन अवलंबणे आणि या अधिनियमितीखाली स्थापन करण्यात आलेल्या विविध संस्थांमार्फत त्यांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यासाठी त्यांच्या संबंधातील कायद्याचे एकत्रीकरण करणे व त्यात सुधारणा करणे याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** संविधानात, अनुच्छेद १५ चा खंड (३), अनुच्छेद ३९ चे खंड (ड) आणि (च), अनुच्छेद ४५ आणि ४७ यांसह, विविध तरतुदींमध्ये, राज्यांवर, मुलांच्या सर्व गरजा भागविण्यात आल्या आहेत आणि त्यांचे मूलभूत मानवी हक्क पूर्णत: सुरक्षित आहेत याची सुनिश्चिती करण्याची प्राथमिक जबाबदारी लादली आहे ;

**आणि ज्याअर्थी,** संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत २० नोव्हेंबर, १९८९ रोजी, मुलांच्या हक्कांसंबंधीचा अभिसंधी अंगीकारला आहे ;

**आणि ज्याअर्थी,** मुलांच्या हक्कांसंबंधीच्या अभिसंधीत, मुलांचे सर्वोत्तम हित साधण्यात सर्व भागीदार राज्यांनी अनुसरावयाची ठराविक मानके विहित केली आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** मुलांच्या हक्कांसंबंधीच्या अभिसंधीत, न्यायिक कार्यवाहीचा अवलंब केल्याखेरीज, शक्य त्या मर्यादेपर्यंत, अपराधास बळी पडणाऱ्या मुलांच्या सामाजिक पुनरेकात्मतेवर भर दिला आहे ;

**आणि ज्याअर्थी,** भारत सरकारने ११ डिसेंबर, १९९२ रोजी या अभिसंधीला मंजुरी दिली आहे ;

**आणि ज्याअर्थी,** मुलांच्या हक्कांसंबंधीच्या अभिसंधीमध्ये विहित केलेली मानके, बाल न्याय प्रशासन, १९८५ साठीचे संयुक्त राष्ट्रांचे मानक किमान नियम (बिजिंग नियम), बालकांना त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेण्यापासून संरक्षण देण्याकरिता संयुक्त राष्ट्रांचे नियम (१९९०) आणि इतर सर्व संबंधित आंतरराष्ट्रीय विलेख लक्षात घेऊन, बालकांच्या संबंधातील विद्यमान कायदा पुनरअधिनियमित करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकावन्नाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

**१.** (१) या अधिनियमास, "**बाल न्याय** (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०००" असे म्हणावे.

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करील अशा दिनांकास*, तो अंमलात येईल.

**व्याख्या.**

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "सल्लागार मंडळ" याचा याचा अर्थ, कलम ६२ अन्वये घटीत झालेले केंद्रीय किंवा राज्य सल्लागार मंडळ किंवा यथास्थिति, जिल्हा आणि शहर पातळीवरील सल्लागार मंडळ, असा आहे ;

(ख) "भीक मागणे" याचा अर्थ,—

(एक) एखाद्या सार्वजनिक ठिकाणी भीक मागणे किंवा ती घेणे अथवा भीक मागण्यासाठी किंवा ती घेण्यासाठी कोणत्याही खाजगी जागेमध्ये, मग तो कोणत्याही बहाण्याने असो-प्रवेश करणे ;

(दोन) भीक मिळविण्याच्या किंवा उकळण्याच्या उद्देशाने कोणतेही क्षत, जखम, इजा, व्यंग किंवा रोग-मग तो स्वत:चा असो, वा अन्य कोणत्याही व्यक्तीचा किंवा एखाद्या प्राण्याचा असो- उघड्यावर टाकणे किंवा त्याचे प्रदर्शन करणे, असा आहे ;

(ग) "मंडळ" याचा अर्थ, कलम ४ अन्वये घटित झालेले "बाल न्याय मंडळ", असा आहे ;

(घ) "काळजी घेण्याची व संरक्षणाची गरज असलेले मूल" याचा अर्थ,—

---

*१ एप्रिल, २००१.

(एक) ज्यास कोणतेही घर किंवा राहण्याचे ठराविक ठिकाण किंवा वसतिस्थान नसल्याचे आणि चरितार्थाचे वरकरणी कोणतेही साधन नसल्याचे आढळून आले आहे,

(दोन) जे, एखाद्या व्यक्ती बरोबर ( मग ती त्या मुलाची पालक असो वा नसो) रहात असेल आणि अशा व्यक्तीने,—

(क) मुलास ठार मारल्याची किंवा इजा पोहोचवण्याची धमकी दिली असेल आणि त्या व्यक्तीकडून त्या धमकीचे पालन केले जाण्याची वाजवी शक्यता असेल, किंवा

(ख) इतर कोणत्याही मुलास किंवा मुलांना ठार मारले असेल, गैरफायदा घेतला असेल किंवा दुर्लक्षित केले असेल आणि त्या व्यक्तीकडून संदर्भित मुलाच्या बाबतीत ठार मारण्याची, गैरफायदा घेतला जाण्याची किंवा दुर्लक्षित केले जाण्याची वाजवी शक्यता असेल,

(तीन) ज्यांचे जगणे मानसिकदृष्ट्या किंवा शारीरिकदृष्ट्या आव्हान आहे अशी किंवा आजारी असलेली मुले आहेत किंवा ज्यांना कोणाचाही आधार नाही किंवा ज्यांची काळजी घेणारे कोणीही नसून ज्यांना जीवघेण्या रोगाने किंवा असाध्य रोगाने ग्रासले आहे अशी मुले,

(चार) ज्यास मात-पिता किंवा पालक आहेत आणि असे माता-पिता किंवा पालक मुलावर नियंत्रण ठेवण्यास अयोग्य किंवा असमर्थ आहेत,

(पाच) ज्यास पिता किंवा माता नाही आणि ज्याची काळजी घेण्यास कोणीही इच्छुक नाही किंवा ज्याच्या पित्याने किंवा मातेने त्याचा परित्याग केला आहे किंवा जे हरवलेले आणि पळून आलेले मूल आहे आणि वाजवी चौकशीनंतरही ज्याच्या पित्याच्या किंवा मातेचा शोध लागला नाही,

(सहा) लैंगिक दुरुपयोगाच्या प्रयोजनासाठी किंवा अवैध कृत्यांसाठी ज्याचे अर्वाच्य शिवीगाळ, छळ किंवा शोषण केले जात आहे किंवा केले जाण्याची शक्यता आहे,

(सात) जे दुबळे असल्याचे आढळून आले आहे आणि ज्यास अंमली पदार्थांच्या दुरुपयोगासाठी किंवा अपव्यापारात गुंतवले जाण्याची शक्यता आहे,

(आठ) ज्याचा गैरवाजवी लाभासाठी दुरुपयोग केला जात आहे किंवा केला जाण्याची शक्यता आहे,

(नऊ) जे कोणत्याही सशस्त्र संघर्षाचा, नागरी विक्षोभाचा किंवा नैसर्गिक आपत्तीचा बळी आहेत असे मूल, असा आहे ;

(ङ) " बालगृह " याचा अर्थ, राज्य शासनाने किंवा स्वयंसेवी संघटनेने स्थापन केलेली आणि त्या शासनाने कलम ३४ अन्वये प्रमाणित केलेली एखादी संस्था, असा आहे ;

(च) " समिती " याचा अर्थ, कलम २९ अन्वये घटित केलेली बाल कल्याण समिती, असा आहे ;

(छ) " सक्षम प्रधिकरण " याचा अर्थ, काळजी घेण्याची व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांच्या संबंधात समिती आणि कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकांच्या संबंधात, मंडळ, असा आहे ;

(ज) " योग्य संस्था " याचा अर्थ, मुलाची जबाबदारी पत्करण्यास तयार असलेली आणि सक्षम प्राधिकरणाकडून अशी संस्था योग्य असल्याचे आढळून आलेली आहे, अशी शासकीय किंवा नोंदणीकृत अशासकीय संघटना किंवा स्वयंसेवी संघटना, असा आहे ;

(झ) " योग्य व्यक्ती " याचा अर्थ, मुलाची जबाबदारी घेण्यास जी तयार आहे आणि मुलास ताब्यात घेण्यासाठी जी योग्य असल्याचे सक्षम प्रधिकरणास आढळून आले आहे, अशी समाजसेवक असलेली व्यक्ती किंवा अन्य एखादी व्यक्ती, असा आहे ;

(ञ) एखाद्या मुलाच्या संबंधात " पालक " याचा अर्थ, त्याचे स्वाभाविक पालक किंवा त्या प्राधिकरणासमोरील कार्यवाहीच्या वेळी, पालक म्हणून, सक्षम प्राधिकरणाने त्या मुलाचा प्रत्यक्ष ताबा किंवा नियंत्रण जिच्याकडे सोपविले आणि मान्यता दिली आहे अशी अन्य एखादी व्यक्ती, असा आहे ;

(ट) " बालक " किंवा " मूल " याचा अर्थ, ज्यास वयाची अठरा वर्षे पूर्ण झालेली नाही अशी व्यक्ती, असा आहे ;

(ठ) " कायद्याशी संघर्ष करीत असलेले बालक " याचा अर्थ, ज्याने अपराध केला असल्याचे अभिकथित केले आहे असा बालक, असा आहे ;

(ड) " स्थानिक प्राधिकरण " याचा अर्थ, ग्राम पातळीवर पंचायत आणि जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद, असा आहे आणि त्यात नगरपालिका समिती किंवा महानगरपालिका किंवा कटक मंडळ किंवा शासनाने स्थानिक प्राधिकरण म्हणून काम करण्यास वैध रीतीने हक्कदार असल्याची ठरविलेली अशी इतर कोणतीही संस्था, याचा समावेश आहे ;

(ढ) " अंमली औषधिद्रव्ये " आणि " मन:प्रभावी पदार्थ " या शब्दांना-अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ (१९८५ चा ६१) यामध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून देण्यात आलेले आहेत, तेच अर्थ असतील,

(ण) " अभीक्षण गृह " याचा अर्थ, कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकांसाठी अभीरक्षण गृह म्हणून राज्य शासनाने किंवा एखाद्या स्वयंसेवी संघटनेने स्थापन केलेले आणि त्या राज्य शासनाने कलम ८ अन्वये प्रमाणित केलेले गृह, असा आहे ;

(त) " अपराध " याचा अर्थ, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये शिक्षापात्र असलेला अपराध, असा आहे ;

(थ) " सुरक्षिततेचे ठिकाण " याचा अर्थ, असे कोणतेही ठिकाण किंवा संस्था (पोलीस ठाणे किंवा तुरुंग नसलेली) की, जिची प्रभारी व्यक्ती एखाद्या बालकाचा स्वेच्छापूर्वक तात्पुरता स्वीकार करण्यास आणि त्याची काळजी घेण्यास तयार आहे आणि जे सक्षम प्राधिकरणाच्या मते, त्या बालकासाठी सुरक्षिततेचे ठिकाण आहे, असा आहे ;

(द) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(ध) " परिवीक्षा अधिकारी " याचा अर्थ, अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ (१९५८ चा २०) या अन्वये परिवीक्षा अधिकारी म्हणून राज्य शासनाकडून नियुक्त करण्यात आलेला अधिकारी , असा आहे ;

(न) " सार्वजनिक ठिकाण " या शब्दाला, अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ (१९५६ चा १०४) यामध्ये जो अर्थ नेमून दिला असेल तोच अर्थ असेल ;

(प) " निवारा गृह " याचा अर्थ, कलम ३७ अन्वये उभारलेले गृह किंवा तात्पुरते निवारा केंद्र, असा आहे ;

(फ) " विशेष गृह " याचा अर्थ, राज्य शासनाने किंवा स्वयंसेवी संघटनेने स्थापन केलेली आणि त्या शासनाने कलम ९ अन्वये प्रमाणित केलेली संस्था, असा आहे ;

(ब) " बालकासाठी विशेष पोलीस पथक " याचा अर्थ, कलम ६३ अन्वये बालकांचा किंवा मुलांना हाताळण्यासाठी पदनिर्देशित केलेले राज्याच्या पोलीस दलाचे पथक, असा आहे ;

(भ) संघ राज्यक्षेत्रांच्या संबंधात " राज्य शासन " याचा अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद २३९ अन्वये राष्ट्रपतींने नियुक्त केलेला त्या संघ राज्यक्षेत्राचा प्रशासक, असा आहे ;

(म) या अधिनियमात वापरलेले, परंतु व्याख्या न केलेले आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यामध्ये व्याख्या केलेले सर्व शब्द आणि शब्दप्रयोग यांना अनुक्रमे त्या संहितेमध्ये नेमून दिल्याप्रमाणे अर्थ असतील.

**एखाद्या बालक न राहिलेल्या बालकाच्या बाबतीत चौकशी चालू ठेवणे.**

**३.** कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकाच्या विरूद्ध किंवा काळजी घेण्याची व संरक्षणाची गरज असलेल्या मुलाविरूद्ध ज्यावेळी चौकशी सुरू करण्यात आली असेल आणि अशा चौकशीच्या काळात ते बालक किंवा ते मूल, बालक किंवा मूल राहिले नसेल त्यावेळी, या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ती चौकशी चालू ठेवता येईल आणि ती व्यक्ती, ही जणू काही अजूनही बालकच किंवा मूलच असल्याप्रमाणे अशा व्यक्तीच्या बाबतीत आदेश देता येतील.

## प्रकरण दोन

## कायद्याशी संघर्ष करीत असलेले बालक

**बाल न्याय मंडळ.**

**४.** (१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जिल्हाकरिता किंवा जिल्ह्यांच्या गटाकरिता या अधिनियमान्वये कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकांच्या संबंधात अशा मंडळांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्यांना नेमून दिलेली किंवा त्यांच्यावर लादलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी, एक किंवा अधिक बाल न्याय मंडळे, घटित करू शकेल.

(२) मंडळ, महानगर दंडाधिकारी किंवा, यथास्थिति, प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी आणि दोन सामाजिक कार्यकर्ते, ज्यापैकी किमान एक सदस्य महिला असेल, यांचे मिळून बनलेले असेल व त्यांचे एक न्यायपीठ बनेल आणि अशा प्रत्येक न्यायपीठाकडे, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३(१९७४ चा २) अन्वये महानगर दंडाधिकाऱ्याला किंवा, यथास्थिति, प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याला प्रदान केलेले अधिकार असतील आणि मंडळावरील दंडाधिकाऱ्याला मुख्य दंडाधिकारी म्हणून पदनिर्देशित केले जाईल.

(३) कोणत्याही दंडाधिकाऱ्याची त्यास बाल मानसशास्त्र किंवा बाल कल्याण यांचे विशेष ज्ञान किंवा प्रशिक्षण असल्याखेरीज, मंडळाचा सदस्य म्हणून नियुक्ती केली जाणार नाही आणि कोणताही सामाजिक कार्यकर्ता, तो मुलांच्या संबंधातील आरोग्य, शिक्षण किंवा कल्याण कार्यक्रम यात किमान सात वर्षे प्रत्यक्षपणे सक्रिय सहभागी असल्याखेरीज त्याची मंडळाचा सदस्य म्हणून नियुक्ती केली जाणार नाही.

(४) मंडळाच्या सदस्यांचा पदावधी आणि ज्या रीतीने अशा सदस्यास राजीनामा देता येईल ती रीत, विहित केल्याप्रमाणे असेल.

(५) मंडळाच्या कोणत्याही सदस्यांची नियुक्ती जर,—

(एक) या अधिनियमाखाली विहीत केलेल्या अधिकारांचा गैरवापर केल्याबद्दल दोषी असल्याचे आढळून आल्यास,

(दोन) तो ज्या नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असेल अशा अपराधाबद्दल सिद्धदोषी असेल आणि अशी अपराध—सिद्धी फिरवण्यात आली नसेल, किंवा अशा अपराधाच्या बाबत त्याला पूर्ण माफी देण्यात आली नसेल,

(तीन) त्याने कोणत्याही सबळ कारणाशिवाय, लागोपाठच्या तीन महिन्यांकरिता मंडळाच्या कामकाजास उपस्थित राहण्यात कसूर केली किंवा एका वर्षामधील तीन चतुर्थांश बैठकी पेक्षाही कमी बैठकींना उपस्थित राहण्यास कसूर केली,

तर, राज्य शासनाकडून चौकशी झाल्यानंतर, समाप्त करण्यात येईल.

**मंडळाच्या संबंधातील कार्यपद्धती, इत्यादी.**

५. (१) मंडळ, विहीत केले असेल अशा वेळी बैठका घेईल आणि आपल्या बैठकीत चालविण्यात येणाऱ्या कामकाजाशी संबंधीत असलेल्या कार्यपद्धीच्या नियमांचे पालन करील.

(२) मंडळाची बैठक नसेल तेव्हा; कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या मुलाला मंडळाच्या प्रत्येक सदस्यापुढे हजर करण्यात येईल.

(३) मंडळाचा कोणताही सदस्य अनुपस्थित असला तरीही, मंडळ कृती करू शकेल, आणि मंडळाने दिलेला कोणताही आदेश, कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर, कोणताही सदस्य अनुपस्थित होता एवढ्या एकाच कारणास्तव विधीअग्राह्य ठरणार नाही :

परंतु, प्रकरणाच्या अंतिम निकालाच्या वेळी मुख्य दंडाधिकाऱ्यासह कमीत कमी दोन सदस्यांची उपस्थिती आवश्यक असेल.

(४) अंतरिम किंवा अंतिम निकालाच्या वेळी, मंडळाच्या सदस्यांमध्ये कोणताही मतभेद उद्‌भवल्यास, बहुमत अधिभावी होईल, परंतु जेव्हा तेते असे बहुमत नसेल तेव्हा, मुख्य दंडाधिकाऱ्याचे मत अधिभावी होईल.

बाल न्याय मंडळाचा अधिकार.

६. (१) ज्यावेळी कोणत्याही जिल्ह्यासाठी किंवा जिल्ह्यांच्या गटासाठी एखादे मंडळ घटित करण्यात आले असेल त्यावेळी अशा मंडळाला, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु या अधिनियमात स्पष्टपणे अन्यता तरतूद केली असेल ते खेरीजकरून, या अधिनियमाखाली कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकांशी संबंधित सर्व कार्यवाहीबाबतचे कामकाज पूर्णपणे चालवण्याचा अधिकार असेल.

(२) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये मंडळास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर, ज्यावेळी उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय यांच्यापुढे एखादी कार्यवाही अपील म्हणून पुनरीक्षणासाठी किंवा अन्यथा येईल, त्यावेळी त्यांच्याकडून केला जाईल.

**या अधिनियमान्वये अधिकार प्रदान करण्यात न आलेल्या दंडाधिकाऱ्याने अनुसरावयाची कार्यपद्धती.**

७. (१) या अधिनियमान्वये मंडळाच्या अधिकाराचा वापर करण्याचा अधिकार प्रदान करण्यात न आलेला कोणताही दंडाधिकारी, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींअन्वये त्याच्यापुढे आणण्यात आलेली कोणतीही व्यक्ती (साक्ष देण्याच्या प्रयोजनासाठी असेल त्या व्यतिरिक्त) बालक किंवा मूल आहे अशा मताचा असेल तेव्हा, तो अशा मताची कोणत्याही विलंबाशिवाय नोंद करील आणि बालकास किंवा मुलास कार्यवाहीच्या अभिलेखासह कार्यवाहीची अधिकारीता असलेल्या सक्षम प्रधिकरणाकडे पाठवील.

(२) पोटकलम (१) अन्वये कार्यवाही ज्याच्याकडे पाठविण्यात आली असेल ते सक्षम प्रधिकरण जणू काही त्या बालकाला किंवा मुलाला मुळातच त्याच्यापुढे आणण्यात आले असल्याप्रमाणे चौकशी करील.

**अभीक्षण गृहे.**

८. (१) कोणत्याही राज्य शासनाला, या अधिनियमान्वये कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकांच्या संबंधातील कोणतीही चौकशी प्रलंबित असेल त्याकाळामध्ये त्याला तात्पुरते स्वीकारण्यासाठी आवश्यक असतील तितकी अभीक्षण गृहे, प्रत्येक जिल्ह्यात किंवा जिल्ह्याच्या गटासाठी, एकतर स्वत: किंवा स्वयंसेवी संघटनेशी करार करून स्थापन करता येतील किंवा ती चालवता येतील.

(२) पोटकलम (१) अन्वये स्थापन करण्यात किंवा चालवण्यात येत असलेल्या गृहाखेरीज इतर कोणतीही संस्था, या अधिनियमान्वये कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकाच्या संबंधातील कोणतीही चौकशी प्रलंबित असेल त्या काळामध्ये त्यांना तात्पुरते स्वीकारण्यासाठी योग्य आहे, असे ज्यावेळी शासनाचे मत असेल त्यावेळी, ते अशा संस्थेला या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी अभीक्षण गृह म्हणून प्रमाणित करू शकेल.

(३) राज्य शासन, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे अभीक्षण गृहे चालवण्यासाठी तरतुदी करू शकेल व त्यामध्ये त्यांच्याकडून बालकांचे पुनर्वसन आणि सामाजिक ऐक्य यांकरिता पुरविण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या सेवांचा दर्जा आणि एखाद्या अभीक्षण गृहाचे प्रमाणन ज्या परिस्थितीत व ज्या रीतीने दिले किंवा काढून घेतले जाऊ शकेल ती परिस्थिती व रीत, यांचा समावेश असेल.

(४) माता, पीता किंवा पालक यांच्या ताब्यात नसलेल्या आणि अभीक्षण गृहात पाठवलेल्या प्रत्येक बालकाला प्राथमिक चौकशीकरिता प्रारंभी अभीक्षण गृहाच्या स्वागत कक्षात ठेवले जाईल, बालकाची काळजी घेणे आणि वर्गीकरण करणे हे त्यांच्या वयोगटानुसार, सात ते बारा वर्षे, बारा ते सोळा वर्षे आणि सोळा ते अठरा वर्षे असे असेल. बालकाच्या शारीरिक आणि मानसिक स्थितीचा योग्यप्रकारे विचार करून आणि केलेल्या अपराधाचा दर्जा पाहून अभीक्षण गृहात पुढील अभिक्रमासाठी ठेवले जाईल.

९. (१) कोणत्याही राज्य शासनाला, या अधिनियमान्वये कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकाचा स्वीकार आणि पुनर्वसन करण्यासाठी आवश्यक असतील तितकी विशेष गृहे प्रत्येक जिल्ह्यात किंवा जिल्ह्याच्या गटांसाठी, एकतर स्वतः किंवा स्वयंसेवी संघटनाशी करार करून, स्थापन करता येतील आणि ती चालवता येतील. **विशेष गृहे.**

(२) पोटकलम (१) अन्वये स्थापन करण्यात किंवा चालवण्यात येत असलेल्या एखाद्या गृहाखेरीज इतर कोणतीही संस्था या अधिनियमान्वये तेथे पाठवावयाच्या कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकाला स्वीकारण्यासाठी योग्य आहे असे ज्यावेळी राज्य शासनाचे मत असेल त्यावेळी ते अशा संस्थेला या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी विशेष गृह म्हणून प्रमाणित करू शकेल.

(३) राज्य शासन, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विशेष गृह चालविण्यासाठी तरतुदी करू शकेल व त्यामध्ये बालकाच्या पुनर्सामाजिकीकरणाकरिता आवश्यक असलेला सेवांचा दर्जा आणि एखाद्या विशेष गृहाचे प्रमाणन ज्या परिस्थितीत व ज्यारीतीने दिले किंवा काढून घेतले जाऊ शकेल ती परिस्थिती व रीत यांचा समावेश असेल.

(४) कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकाचे वय व त्यांनी केलेल्या अपराधाचे स्वरूप आणि त्याची शारीरिक व मानसिक स्थिती याच्या आधारे त्यांचे वर्गीकरण व विलगीकरण यासाठीही पोटकलम (३) अन्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे तरतुदी करता येतील.

१०. (१) कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकाला पोलिसांनी ताब्यात घेतल्याबरोबर, त्या बालकांसाठी विशेष पोलीस पथक किंवा पदनिर्देशित पोलीस अधिकाऱ्याच्या ताब्यात देण्यात येईल आणि ते ताबडतोब ही बाब मंडळाच्या सदस्याला कळवील. **कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकाला ताब्यात घेणे.**

(२) राज्य शासन, पुढील गोष्टींसाठी या अधिनियमाशी सुसंगत असतील असे नियम करील :—

(एक) ज्या व्यक्तींमार्फत कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या कोणत्याही बालकाला (नोंदणीकृत स्वयंसेवी संघटनेसह) मंडळापुढे हजर करता येईल अशा व्यक्ती ;

(दोन) ज्या रीतीने अशा बालकाला अभीक्षण गृहात पाठवता येईल ती रीत.

११. एखाद्या बालकाला या अधिनियमाच्या अनुषंगाने जिच्या ताब्यात ठेवण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीचे, तो आदेश अंमलात असताना, ती त्या बालकाची माता-पिता असली तर त्याच्यावर तिचे जसे नियंत्रण राहिले असते तसेच नियंत्रण असेल आणि ती त्याच्या निर्वाहास जबाबदार असेल आणि त्याच्या पिता किंवा माता किंवा अन्य कोणतीही व्यक्ती त्याच्यावर हक्क सांगत आहे असे असले तरीही, सक्षम प्राधिकरणाने नमूद केलेल्या कालावधीत ते बालक त्याच्याच ताब्यात राहणे चालू असेल. **अभिरक्षकाचे बालकावरील नियंत्रण.**

१२. (१) जेव्हा एखाद्या जमानतयोग्य किंवा बिनजमानती अपराधाचा आरोप असलेल्या आणि बालक असल्याचे स्पष्टपणे दिसत असेल अशा कोणत्याही व्यक्तीला अटक करण्यात किंवा स्थानबद्ध करण्यात आले असेल किंवा ती मंडळापुढे हजर झाली असेल किंवा तिला तेथे आणले गेले असेल, तेव्हा अशा व्यक्तीला फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यामध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जामीन देऊन किंवा जामीन न देता जमानतीवर मुक्त केले जाईल. परंतु, अशा मुक्ततेमुळे ती कोणत्याही विख्यात **बालकाचा जामीन.**

गुन्हेगाराच्या सहवासात येण्याची किंवा त्यामुळे तिला नैतिक, शारीरिक किंवा मानसिक धोका होण्याची किंवा तिच्या मुक्ततेमुळे न्यायाचे उद्दिष्ट निष्फळ होण्याची शक्यता आहे, असे मानण्यास वाजवी कारणे दिसून येत असतील तर, तिला अशाप्रकारे मुक्त केले जाणार नाही.

(२) जेव्हा अटक करण्यात आलेल्या अशा व्यक्तीला, पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याकडून पोटकलम (१) अन्वये जामिनावर मुक्त करण्यात आले नसेल तेव्हा, तिला मंडळापुढे आणणे शक्य होईतोपर्यंत असा अधिकारी तिला विहित रीतीने एखाद्या अभीक्षण गृहात ठेवण्याची व्यवस्था करील.

(३) जेव्हा अशा व्यक्तीला मंडळाकडून पोटकलम (१) अन्वये जामीनावर मुक्त केले जाणार नाही तेव्हा तिची तुरूंगात रवानगी करण्याऐवजी, ते मंडळ तिला तिच्यासंबंधाची चौकशी प्रलंबित असेल त्या काळात त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल तितक्या कालावधीसाठी एखाद्या अभीक्षण गृहात किंवा सुरक्षिततेच्या ठिकाणी पाठवण्याचा आदेश देईल.

**माता-पित्यास किंवा बालकास किंवा परिवीक्षा अधिकाऱ्यास माहिती देणे.**

**१३.** ज्यावेळी एखाद्या बालकाला अटक करण्यात आली असेल त्यावेळी त्या बालकाला ज्या पोलीस ठाण्यावर किंवा बालकांसाठीच्या विशेष पोलीस पथकाकडे आणले गेले असेल तेथील प्रभारी अधिकारी अटकेनंतर शक्य होईल तितक्या लवकर,—

(क) बालकाचे माता-पिता किंवा पालक, यांचा पत्ता लागल्यास त्याला अशा अटकेबद्दल माहिती देईल आणि ते बालक जेथे हजर होणार असेल त्या मंडळात हजर राहण्याचा निदेश देईल ; आणि

(ख) चौकशी करण्यासाठी मंडळाला ज्यापासून मदत होण्याची शक्यता असेल असे त्या बालकाचे पूर्ववृत्त व कौटुंबिक पार्श्वभूमी आणि इतर महत्त्वाची परिस्थिती यासंबंधीची माहिती मिळविणे शक्य व्हावे म्हणून परिवीक्षा अधिकाऱ्याला अशा अटकेसंबंधीची माहिती देईल.

**बालकाच्या संबंधात मंडळाकडून चौकशी.**

**१४.** ज्यावेळी ज्याच्यावर एखाद्या अपराधाचा आरोप करण्यात आला आहे असे एखादे बालक, एखाद्या मंडळात हजर केले जाईल त्यावेळी ते मंडळ या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये चौकशी करील आणि त्या बालकाच्या संबंधात, त्याला योग्य वाटेल असा आदेश देईल :

परंतु, या चौकशीच्या प्रारंभाच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या आत, मंडळाने प्रकरणाबाबतची परिस्थिती लक्षात घेऊन आणि विशेष प्रकरणाबाबत असा कालावधी वाढविण्याची कारणे लेखी नमूद करून, हा कालावधी वाढवला नाही तर, या कलमाखालील चौकशी पूर्ण केली जाईल.

**बालकाच्या संबंधात देता येतील असे आदेश.**

**१५.** (१) एखाद्या बालकाने अपराध केला आहे अशी एखाद्या मंडळाची चौकशी अंती खात्री पटली असेल तेव्हा, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही विरूद्ध असले तरी त्याला तसे योग्य वाटल्यास, ते मंडळ,—

(क) त्याची यथोचित चौकशी करून आणि माता-पिता किंवा पालक आणि बालक यांना समुपदेशन देऊन, उपदेश किंवा समज दिल्यानंतर त्या बालकाला घरी जाण्याची परवानगी देईल ;

(ख) समूह समुपदेशन आणि तत्सम कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी बालकाला निदेश देईल ;

(ग) समाजसेवा पार पाडण्याचे बालकाला आदेश देईल ;

(घ) ते बालक चौदा वर्षांहून अधिक वयाचे असेल आणि अर्थार्जन करीत असेल तर, बालकाच्या पिता किंवा मातेला किंवा स्वतः बालकाला द्रव्यदंड भरण्याचा आदेश देईल ;

(ङ) चांगले वर्तन ठेवण्याच्या परिवीक्षेच्या शर्तीवर, त्या बालकाला मुक्त करावे आणि त्यास त्याच्या पित्याने किंवा मातेने किंवा पालकाने किंवा अन्य योग्य व्यक्तीने त्या बालकाचे चांगले वर्तन आणि क्षेम यांसाठी ते मंडळ फर्मावील त्याप्रमाणे प्रतिभूतीसह किंवा प्रतीभूतीरहित बंधपत्र करून दिल्यानंतर, त्याच्या अशा पित्याने किंवा मातेने किंवा पालकाने किंवा अन्य योग्य व्यक्तीने काळजी घ्यावी यासाठी तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा कितीही कालावधीसाठी ठेवावे असा निदेश देईल ;

(च) चांगले वर्तक ठेवण्याच्या परिवीक्षेच्या शर्तीवर, त्या बालकाला मुक्त करावे आणि त्या बालकाचे चांगले वर्तन आणि क्षेम यांसाठी तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा कितीही कालावधीसाठी एखाद्या योग्य संस्थेकडे काळजी घेण्यासाठी ठेवण्याबाबत निदेश देईल ;

(छ) (एक) सतरा वर्षांहून अधिक परंतु अठरा वर्षांपेक्षा कमी वयाच्या अशा बालकाच्याबाबत दोन वर्षांपेक्षा कमी नाही अशा कालावधीसाठी ;

(दोन) अन्य कोणत्याही बालकाच्या बाबतीत, जोपर्यंत तो बालक राहणार नाही अशा कालावधीसाठी, त्यास एखाद्या विशेष गृहात पाठविण्याचे निदेश देणारा आदेश देईल :

परंतु, जर अपराधाचे स्वरूप आणि प्रकरणाची परिस्थिती विचारात घेऊन तसे करणे समयोचित आहे याबद्दल त्याची खात्री पटली असेल तर, मंडळाला अभिलिखित करावयाच्या कारणांसाठी अशा वास्तव्याचा कालावधी त्याला योग्य वाटेल अशा कालावधी इतका कमी करता येईल.

(२) मंडळ, बालकावरील सामाजिक अन्वेषण अहवाल, एकतर परिवीक्षा अधिकाऱ्यामार्फत किंवा मान्यताप्राप्त स्वयंसेवी संघटनेमार्फत किंवा अन्यथा, प्राप्त करील आणि अशा अहवालाचे निष्कर्ष पुढील आदेश देताना विचारात घेईल.

(३) पोट-कलम (१) च्या खंड (घ), खंड (ड) किंवा खंड (च) अन्वये ज्यावेळी एखादा आदेश देण्यात आला असेल त्यावेळी, मंडळाला, त्या बालकाच्या आणि सार्वजनिक हिताच्या दृष्टीने, तसे करणे समयोचित वाटल्यास, त्याच्या बरोबरीने आणखी असा आदेश देता येईल की, कायद्याशी संघर्ष करीत असलेले बालक त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तीन वर्षांहून अधिक नसलेल्या अशा कालावधीत, त्यामध्ये नाव नमूद करण्यात आलेल्या परिवीक्षा अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली राहील आणि अशा देखरेखीसंबंधीच्या आदेशात कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकाच्या यथोचित देखरेखीसाठी त्यास योग्य वाटतील अशा शर्ती लादता येतील ;

परंतु, परिवीक्षा अधिकाऱ्याकडून अहवाल मिळाल्यानंतर किंवा अन्यथा मागाहून कोणत्याही वेळी त्या मंडळाला जर असे दिसून आले की, देखरेखीच्या कालावधीत त्या कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकाचे वर्तन चांगले नव्हते किंवा बालकाला ज्या योग्य संस्थेकडे काळजी घेण्यासाठी ठेवण्यात आले होते ती यापुढे त्या बालकाचे चांगले वर्तन किंवा क्षेम याबद्दल खात्री देण्यास समर्थ किंवा तयार नाही, तर ते त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर त्या कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकाला एखाद्या विशेष गृहात पाठविण्याचा आदेश देईल.

(४) पोटकलम (२) अन्वये देखरेखीसंबंधीचा आदेश देणारे मंडळ, त्या बालकास आणि त्याच्या पित्याला किंवा मातेला किंवा पालकाला किंवा जिच्याकडे काळजी घेण्यासाठी त्याला ठेवण्यात आले असेल अशा इतर योग्य व्यक्तीला किंवा, यथास्थिति, योग्य संस्थेला त्या आदेशाच्या अटी व शर्ती समजावून देईल आणि ते, त्या देखरेखीसंबंधीच्या आदेशाची एक प्रत तात्काळ त्या बालकास, त्याच्या पित्यास किंवा मातेस किंवा पालकास किंवा इतर योग्य व्यक्तीस किंवा, यथास्थिति, योग्य संस्थेस, जामीनदार असल्यास, त्याला आणि परिवीक्षा अधिकाऱ्यास देईल.

**बालकाविरुद्ध न द्यावयाचे आदेश.**

**१६.** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यामध्ये काहीही विरुद्ध असले तरी, कोणत्याही कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकाल मृत्यूची किंवा जन्मठेपेची शिक्षा दिली जाणार नाही अथवा त्याने द्रव्यदंड भरण्यास कसूर केल्याबद्दल किंवा प्रतिभूती देण्यास कसूर केल्याबद्दल त्याची कारागृहात रवानगी केली जाणार नाही :

परंतु वयाची सोळा वर्षे पूर्ण केलेल्या एखाद्या बालकाने ज्यावेळी एखादा अपराध केला असेल आणि मंडळाची खात्री पटली असेल की, केलेला अपराध इतक्या गंभीर स्वरुपाचा आहे किंवा त्याची वागणूक व वर्तन असे राहिले आहे की, त्याच्या स्वत:च्या हिताच्या दृष्टीने किंवा एखाद्या विशेष गृहातील अन्य बालकाच्या हिताच्या दृष्टीने त्याला अशा विशेष गृहात पाठविणे योग्य होणार नाही आणि या अधिनियमान्वये तरतूद केलेल्या अन्य उपाययोजनांपैकी कोणतीही उपाययोजना योग्य किंवा पुरेशी नाही त्यावेळी ते मंडळ, त्याला योग्य वाटेल अशा ठिकाणी आणि अशा रीतीने त्या कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकाला सुरक्षित अभिरक्षेत ठेवण्याचा आदेश देईल आणि आदेशासाठी या प्रकरणाचा अहवाल राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल.

(२) मंडळाकडून, पोटकलम (१) अन्वये अहवाल मिळाल्यावर, राज्य शासन, त्या बालकाच्या बाबतीत, त्याला योग्य वाटेल अशी व्यवस्था करील आणि त्याला योग्य वाटेल अशा सुरक्षित अभिरक्षेत आणि अशा शर्तींवर अशा बालकाला ठेवण्याचा आदेश देईल :

परंतु, अशा तऱ्हेने आदेशात देण्यात आलेल्या स्थानबद्धतेचा कालावधी हा त्या बालकाने केलेल्या अपराधासाठी, त्याला जास्तीत जास्त जेवढ्या कालावधीच्या कारावासाची शिक्षा देता आली असती, त्या कालावधीपेक्षा अधिक असणार नाही.

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या प्रकरण आठ खालील कार्यवाही बालकाविरूद्ध सक्षम असणार नाही.**

**१७.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यामध्ये काहीही विरुद्ध असले तरी, एखाद्या बालकाविरुद्ध उक्त संहितेच्या प्रकरण आठ अन्वये कोणतीही कार्यवाही सुरू केली जाणार नाही आणि कोणताही आदेश दिला जाणार नाही.

बालकाची आणि बालक नसलेल्या व्यक्तीची कार्यवाही संयुक्तपणे होणार नाही.

**१८.** (१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम २२३ मध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही बालकावर, बालक नसलेल्या व्यक्तीसमवेत कोणत्याही अपराधाचा आरोप केला जाणार नाही किंवा त्याची संपरीक्षा केली जाणार नाही.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम २२३ अन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये, एखाद्या बालकावर एखाद्या अपराधाचा आरोप करण्यात आला असल्यास पोटकलम (१) मध्ये अंतर्भूत असलेला प्रतिषेध नसता तर, असे बालक आणि बालक नसलेली अन्य कोणतीही व्यक्ती यांच्यावर एकत्रितपणे आरोप करण्यात आला असेल आणि त्यांची एकत्रितपणे संपरीक्षा करण्यात येत असेल तर, त्या अपराधाची दखल घेणारे मंडळ त्या बालकाची आणि त्या अन्य व्यक्तीची वेगवेगळी संपरीक्षा करण्याचा निदेश देईल.

दोष सिद्ध झाल्यामुळे येणाऱ्या निरर्हतेचे निरसन.

**१९.** (१) अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या बालकाने अपराध केलेला आहे आणि या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये ज्याच्यावर कार्यवाही करण्यात आलेली आहे त्यास, अशा कायद्याखालील अपराधांचा दोष सिद्ध झाल्यामुळे येणारी निरर्हता सोसावी लागणार नाही.

(२) मंडळ, अपील करण्याचा कालावधी समाप्त झाल्यानंतर किंवा, यथास्थिति, नियमान्वये विहित केलेला असेल असा वाजवी कालावधी समाप्त झाल्यानंतर असा दोष सिद्ध करण्याशी संबद्ध अभिलेख काढून टाकण्याचा निदेश देणारा आदेश देऊ शकेल.

प्रलंबित खटल्यांच्या बाबतीतील विशेष तरतूद.

**२०.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, हा अधिनियम ज्या क्षेत्रामध्ये ज्या दिवशी अंमलात आणला गेला असेल त्या दिवशी त्या क्षेत्रातील कोणत्याही न्यायालयात एखाद्या बालकासंबंधात प्रलंबित असलेली सर्व कार्यवाही त्या न्यायालयात जणू काही हा अधिनियम संमत झाला नसल्याप्रमाणे चालू राहील आणि त्या बालकाने अपराध केला असल्याचे त्या न्यायालयाला आढळून आल्यास, न्यायालय तसा निष्कर्ष अभिलिखित करील आणि त्या बालकाच्या संबंधात शिक्षादेश देण्याऐवजी त्या बालकाला मंडळाकडे पाठवील व ते मंडळ, या अधिनियमाखालील चौकशीवरून त्या बालकाने अपराध केलेला आहे, अशी जणू काही त्याची खात्री पटल्याप्रमाणे, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार त्या बालकासंबंधात आदेश देईल.

या नियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत गुंतलेल्या बालकांची नावे, इत्यादी प्रकाशित करण्यास मनाई.

**२१.** (१) कोणतेही वर्तमानपत्र, मासिक, वार्तापत्र किंवा दृक्माध्यम यातील एखाद्या कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकाच्या संबंधातील या अधिनियमाखालील कोणत्याही चौकशीच्या कोणत्याही वृत्तांतात त्या बालकाचे नाव, पत्ता व शाळा किंवा त्या बालकाची ओळख पटण्यास सहाय्य होईल असा अन्य कोणताही तपशील उघड केला जाणार नाही. तसेच अशा कोणत्याही बालकाचे चित्रही प्रकाशित केले जाणार नाही :

परंतु, चौकशी करणाऱ्या प्राधिकरणाला अभिलिखित करावयाच्या कारणांसाठी अशा गोष्टी उघड करणे त्या बालकाच्या हिताचे आहे, असे त्याचे मत असल्यास, कारणे अभिलिखित करून, त्या गोष्टी उघड करण्यास परवानगी देता येईल.

(२) पोटकलम (१) च्या तरतुदींचे उल्लघंन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा दिली जाईल.

निसटलेल्या बालकांच्या संबंधातील तरतूद.

**२२.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही विरुद्ध असले तरी, कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला, एखाद्या विशेष गृहातून किंवा एखाद्या अभिक्षण गृहातून किंवा या अधिनियमान्वये जिच्याकडे काळजी घेण्यासाठी त्याला ठेवण्यात आले असेल, त्या व्यक्तीकडून निसटून पळालेल्या एखाद्या बालकास वॉरंटशिवाय ताब्यात घेता येईल आणि तो त्या बालकाला त्या विशेष गृहात किंवा त्या अभीक्षण गृहात किंवा, यथास्थिति, त्या व्यक्तीकडे परत पाठवील आणि अशा निसटून जाण्याच्या कारणास्तव त्या बालकासंबंधात कोणतीही कार्यवाही दाखल केली जाणार नाही. परंतु, ते विशेष गृह किंवा ते अभीरक्षण गृह किंवा ती व्यक्ती, त्या बालकाच्या संबंधात आदेश काढणाऱ्या मंडळाला माहिती दिल्यानंतर, या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये त्या बालकाच्या संबंधात आवश्यक वाटेल अशी उपाययोजना करील.

बालकाला किंवा मुलाला क्रूरपणे वागविण्याबद्दल शिक्षा.

**२३.** एखाद्या बालकाचा किंवा मुलाचा प्रत्यक्ष ताबा किंवा त्याच्यावर नियंत्रण असलेली जी कोणतीही व्यक्ती त्या बालकावर हमला करील, त्याचा परित्याग करील, त्याला उघड्यावर टाकील किंवा त्याच्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करील किंवा त्यासाठी कारणीभूत होईल किंवा अशा बालकाला किंवा मुलाला अनावश्यक मानसिक किंवा शारीरिक यातना होऊ शकतील अशारितीने त्याच्यावर हमला होईल, त्याचा परित्याग केला जाईल, त्यास उघड्यावर टाकले जाईल किंवा तो दुर्लक्षित होईल अशी व्यवस्था करील किंवा असे, घडवून आणील तेव्हा, तिला सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**२४.** (१) जो कोणी कोणत्याही बालकाला किंवा मुलाला भीक मागण्याच्या प्रयोजनांसाठी राबवील किंवा त्याचा त्यासाठी उपयोग करून घेईल किंवा कोणत्याही बालकाला भीक मागावयास लावील त्यास तीन वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल. **भीक मागण्याच्या कामासाठी बालकाला किंवा मुलाला राबविणे.**

(२) एखाद्या बालकाचा किंवा मुलाचा प्रत्यक्ष ताबा किंवा त्याच्यावर नियंत्रण असलेली जी कोणतीही व्यक्ती, पोटकलम (१) अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध करण्यास अपप्रेरणा देईल तिला एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**२५.** जो कोणी, कोणत्याही बालकाला किंवा मुलाला सार्वजनिक ठिकाणी कोणतेही मादक मद्य किंवा एखाद्या रीतसर अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीच्या आदेशावरून असेल त्या खेरीज किंवा आजारपणाखेरीज कोणतेही अंमली औषधिद्रव्य किंवा मन:प्रभावी पदार्थ देईल किंवा देण्याची व्यवस्था करील त्यास तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल. **कोणत्याही बालकाला किंवा मुलाला मादक मद्य किंवा अंमली औषधिद्रव्ये किंवा मन:प्रभावी पदार्थ देण्याबद्दल शास्ती.**

**२६.** जो कोणी, एखाद्या बालकाला किंवा मुलाला वरकरणी कोणत्याही जोखमीच्या रोजगारावर लावण्यासाठी प्राप्त करील, त्याला बंधनात ठेवेल आणि त्या बालकाची किंवा मुलाची मिळकत त्याला देणार नाही किंवा अशी मिळकत स्व:तच्या प्रयोजनांसाठी उपयोगात आणील त्यास तीन वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल. **बालक आणि मूल कर्मचाऱ्यांचे शोषण.**

**२७.** कलमे २३, २४, २५ व २६ यात शिक्षापात्र असलेले अपराध दखलपात्र असतील. **विशेष अपराध.**

**२८.** ज्यावेळी एखाद्या कृतीमुळे किंवा अकृतीमुळे या अधिनियमान्वये अन्य कोणत्याही केंद्रीय किंवा राज्य अधिनियमान्वये शिक्षापात्र असेलला एखादा अपराध घडत असेल त्यावेळी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे आढळून आलेला अपराधी ज्यामध्ये अधिक प्रमाणात शिक्षेची तरतूद करण्यात आली असेल अशाच अधियमाखाली शिक्षेस पात्र होईल. **पर्यायी शिक्षा.**

## प्रकरण तीन

## काळची घेण्याची व संरक्षणाची गरज असलेले मूल

**२९.** (१) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रत्येक जिल्ह्यासाठी किंवा जिल्ह्यांच्या गटासाठी एक किंवा अधिक बाल-कल्याण समित्या, या अधिनियमान्वये काळजी घेण्याची व संरक्षणाची गरज असलेल्या मुलाच्या संबंधात अशा समित्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्यांना नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी घटित करील. **बाल-कल्याण समिती.**

(२) ही समिती, अध्यक्ष आणि राज्य शासनाला नियुक्ती करणे योग्य वाटेल असे चार इतर सदस्य यांची मिळून बनलेली असेल व त्यांपैकी किमान एक सदस्य महिला असेल आणि दुसरा मुलांशी संबंधित बाबींमधील तज्ज्ञ असेल.

(३) अध्यक्ष आणि सदस्यांची अर्हता आणि त्यांच्या नियुक्तीचा कालावधी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(४) समितीच्या कोणत्याही सदस्याची नियुक्ती जर,—

(एक) तो, या अधिनियमाखाली निहित असलेल्या अधिकारांचा गैरवापर केल्याबद्दल दोषी असल्याचे आढळून आला तर ;

(दोन) तो, ज्यात नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असेल अशा अपराधाबद्दल त्याचा दोष सिद्ध झाला असेल आणि अशी अपराधसिद्धी फिरवण्यात आली नसेल किंवा अशा अपराधाच्या संबंधात त्याला पूर्ण माफी देण्यात आली नसेल तर ;

(तीन) त्याने, कोणत्याही सबळ कारणाशिवाय, लागोपाठच्या तीन महिन्यांकरिता समितीच्या कामकाजात उपस्थित राहण्यास कसूर केली तर किंवा एका वर्षामधील तीन-चतुर्थांश बैठकींपेक्षाही कमी बैठकींना उपस्थित राहण्यास कसूर केली तर, राज्य शासनाकडून चौकशी झाल्यानंतर समाप्त करण्यात येईल.

(५) समिती, दंडाधिकाऱ्यांचे न्यायपीठ म्हणून कार्य करील आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) अन्वये एखाद्या महानगर दंडाधिकाऱ्याला किंवा, यथास्थिति, एखाद्या प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्याला प्रदान करण्यात आलेले अधिकार असतील.

**३०.** (१) समिती, विहित केले असेल अशा वेळी बैठक भरवील आणि बैठकींच्या वेळी तिच्या कामकाजाशी संबंधित असतील अशा कार्यपद्धीच्या नियमांचे पालन करील. **समितीच्या संबंधातील कार्यपद्धती, इत्यादी.**

(२) समितीची बैठक नसेल त्यावेळी, काळजी घेण्याची आणि संरक्षणाची गरज असलेल्या मुलाला, सुरक्षित अभिरक्षेत किंवा अन्यथा ठेवण्याची समितीच्या प्रत्येक सदस्यापुढे हजर करण्यात येईल.

(३) कोणत्याही अंतरिम निर्णयाच्या वेळी समितीच्या सदस्यांमध्ये कोणताही मतभेद उद्‌भवल्यास बहुमत अधिभावी होईल, परंतु जेव्हा तेथे असे बहुमत नसेल तेव्हा, अध्यक्षाचे मत अधिभावी होईल.

(४) पोटकलम (१) च्या तरतुदीच्या अधीनतने, समितीचा कोणताही सदस्य अनुपस्थित असला तरीही, समिती कृती करू शकेल आणि समितीने दिलेला कोणताही आदेश, कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणताही सदस्य अनुपस्थित होता, एवढ्या एकाच कारणास्तव विधिअग्राह्य ठरणार नाही.

समितीचे अधिकार.

**३१.** (१) मुलांची काळजी, संरक्षण, वागणूक, विकास आणि पुनर्वसन यांसंबंधीच्या प्रकरणे निकालात काढण्याचे अंतिम प्राधिकार समितीकडे असतील, तसेच मुलांच्या मूलभूत गरजा आणि मानवी हक्काच्या संरक्षणाकरिता समिती तरतूद करील.

(२) ज्या वेळी कोणत्याही क्षेत्राकरिता समिती घटित करण्यात आली असेल त्यावेळी असा समितीला त्या त्या वेळी अंमलात असेलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली असेल ती खेरीजकरून, काळजी घेण्याची व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांशी संबंधित या अधिनियमाखालील सर्व कार्यवाहींच्या बाबतचे कामकाज चालविण्याच्या अनन्य अधिकार असेल.

समितीपुढे हजर करणे.

**३२.** (१) काळजी घेण्याची व संरक्षणाची गरज असलेल्या कोणत्याही मुलाला पुढीलपैकी कोणतीही व्यक्ती समितीपुढे हजर करू शकेल :—

(एक) कोणताही पोलीस अधिकारी किंवा बालकांसाठी विशेष पोलीस दल किंवा एखादा पदनिर्देशित पोलीस अधिकारी ;

(दोन) कोणताही लोकसेवक ;

(तीन) चाईल्डलाईन (Childline) ही नोंदणीकृत स्वयंसेवी संघटना किंवा अशी अन्य स्वयंसेवी संघटना किंवा राज्य शासनाकडून मान्यता मिळाली असेल असे एखादे अभिकरण ;

(चार) कोणताही सामाजिक कार्यकर्ता किंवा राज्य शासनाकडून प्राधिकृत करण्यात आलेला लोकहितैषी नागरिक ; किंवा

(पाच) स्वतः ते मूल.

(२) राज्य शासन, चौकशी प्रलंबित असेल त्या काळामध्ये पोलिसांना आणि समितीला ज्या रीतीने अहवाल सादर करावयाचा ती रीत आणि मुलाला बालगृहात पाठवण्याची व त्यांच्याकडे सोपविण्याची रीत याकरिता तरतूद करण्यासाठी या अधिनियमाशी सुसंगत असतील असे नियम करील.

चौकशी.

**३३.** (१) कलम ३२अन्वये अहवाल मिळाल्यावर, समिती किंवा कोणताही पोलीस अधिकारी किंवा बालकांसाठी विशेष पोलीस दल किंवा पदनिर्देशित पोलीस अधिकारी विहित रीतीने चौकशी करील आणि समिती, स्वतःहून किंवा कलम ३२ च्या पोटकलम (१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे कोणत्याही व्यक्तीकडून किंवा अभिकरणाकडून मिळालेल्या अहवालावरून, सामाजिक कार्यकर्ता किंवा बाल—कल्याण अधिकारी यांच्याकडून मुलाची सत्वर चौकशी करण्यासाठी त्याला बालगृहात पाठविण्याचा आदेश देईल.

(२) या कलमाखालील चौकशी आदेश मिळाल्यापासून चार महिन्यांच्या आत किंवा समितीने ठरवून दिला असेल अशा कमीत कमी कालावधीत पूर्ण करण्यात येईल ;

परंतु, चौकशी अहवाल सादर करण्याचा कालावधी, परिस्थिती विचारात घेऊन आणि अभिलिखित कारणांसाठी समिती ठरवील इतक्या कालावधीपर्यंत वाढवता येईल.

(३) चौकशी पूर्ण झाल्यानंतर उक्त मुलाला कुटुंब नाही किंवा सकृतदर्शनी आधार नाही, असे समितीचे मत असेल तर, त्याच्याकरिता योग्य पुनर्वसनाची सोय होईपर्यंत किंवा तो अठरा वर्षे वयाचा होईपर्यंत, त्या मुलाला बालगृहात किंवा निवारागृहात राहण्याची परवानगी देता येईल.

बालगृहे.

**३४.** (१) राज्य शासन, चौकशी प्रलंबित असेल त्या काळामध्ये एकतर स्वतःहून किंवा स्वयंसेवी संघटनेच्या सहकार्याने प्रत्येक जिल्ह्यात किंवा, यथास्थिति, जिल्ह्यांच्या गटात, काळजी घेण्याची व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांना स्वीकारण्यासाठी आणि नंतर त्याची काळजी घेणे, त्यांच्यावर उपचार करणे, त्यांना शिक्षण देणे, प्रशिक्षण देणे, त्यांचा विकास करणे आणि त्यांचे पुनर्वसन करणे यांसाठी बालगृहे स्थापन करील व ती चालवील.

(२) राज्य शासन, या अधिनियमाखालील करण्यात आलेल्या नियमांद्वारे बालगृहे चालविण्याची तरतूद करू शकेल व त्यामध्ये त्यांनी राखावयाच्या सेवांचा दर्जा व स्वरूप आणि एखाद्या बालगृहाचे प्रमाणन किंवा स्वयंसेवी संघटनेची मान्यता ज्या परिस्थितीत आणि ज्या रीतीने दिली किंवा काढून घेतली जाऊ शकेल ती परिस्थिती आणि रीत यांचा समावेश असेल.

**३५.** (१) राज्य शासन, विहित करण्यात येईल इतक्या कालावधीसाठी आणि अशा प्रयोजनांकरिता राज्य, जिल्हा किंवा, यथास्थिति शहर यामधील बालगृहांकरिता निरीक्षण समित्या (यात यापुढे ज्याचा निर्देश " निरीक्षण समित्या " असा करण्यात आला आहे) नेमील. **निरीक्षण.**

(२) एखाद्या राज्याची, जिल्ह्याची किंवा शहराची निरीक्षण समिती ही राज्य शासन, स्थानिक प्राधिकरण समिती, स्वयंसेवी संघटना यांचे विहित करण्यात येतील इतके प्रतिनिधी आणि विहित करण्यात येतील असे इतर वैद्यकीय तज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्ते यांची मिळून बनलेली असेल.

**३६.** केंद्र सरकार किंवा राज्य शासन, त्या शासनाने विनिर्दिष्ट केले असेल अशा कालावधीत आणि अशा व्यक्ती व संस्था यांच्यामार्फत बालगृहांच्या कार्याचे संनियंत्रण व मूल्यमापन करेल. **सामाजिक लेखापरीक्षण.**

**३७.** (१) राज्य शासन, नामांकित आणि समर्थ स्वयंसेवी संघटनांना मान्यता देईल आणि बालके किंवा मुलांकरिता आवश्यक असतील तितकी निवारागृहे उभारण्यासाठी आणि त्यांचा कारभार पाहण्यासाठी, त्यांना सहाय्य करील. **निवारागृहे.**

(२) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली निवारागृहे कलम ३२ च्या पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तींमार्फत अशा निवारागृहांमध्ये आणलेल्या तातडीच्या आधाराची गरज असलेल्या मुलांकरिता तात्पुरता निवारा केंद्रे म्हणून कार्य करतील.

(३) शक्य असेल तेथवर, निवारागृहांना नियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा सुविधा असतील.

**३८.** (१) जर चौकशी दरम्यान असे आढळून आले की, ते मूल समितीच्या अधिकाराबाहेरील ठिकाणाचे आहे तर, समिती त्या मुलाचे निवासस्थान असलेल्या ठिकाणी अधिकारिता असलेल्या सक्षम प्राधिकरणाकडे त्या मुलाला हस्तांतरित करण्याचा ओदश देईल. **हस्तांतरण.**

(२) अशा बालकाला किंवा मुलाला सुरूवातीला ज्या निवारागृहात दाखल केले होते तेथील कर्मचारी संरक्षण म्हणून सोबत करतील.

(३) राज्य शासनाला, मुलाला द्यावयाच्या प्रवास भत्त्याकरिता नियम करता येतील.

**३९.** (१) कोणत्याही बालगृहाचा किंवा निवारागृहाचा मूळ उद्देश, मुलांचे पुनःस्थापन करणे आणि त्यांना संरक्षण देणे, हा असेल. **पुनःस्थापना.**

(२) बालगृहे किंवा, यथास्थिति, निवारागृहे, कौटुंबिक वातावरणापासून तात्पुरते किंवा कायमस्वरूपी वंचित असणाऱ्या एकाद्या मूलास जर असे मूल बालगृहात किंवा, यथास्थिति, निवारागृहात, काळजी घेणे व संरक्षण यांसाठी ठेवण्यात आले असेल तर, त्याच्या पुनःस्थापनेसाठी व संरक्षणासाठी आवश्यक वाटतील अशी पावले उचलतील.

(३) समितीला, काळजी घेण्याची व संरक्षणाची गरज असलेल्या कोणत्याही मुलास, त्याचे माता-पिता, पालक, योग्य व्यक्ती किंवा, यथास्थिति, योग्य संस्था यांच्याकडे परत देण्यांचा आणि त्यांना योग्य निदेश देण्याचा अधिकार असेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, मुलाचे पुनःस्थापन याचा अर्थ,—

(क) माता-पिता ;

(ख) दत्तक घेणारे माता-पिता ;

(ग) पालक, माता-पिता यांच्याकडे मुलाला परत देणे, असा आहे.

## प्रकरण चार

## पुनर्वसन आणि सामाजिक पुनरेकात्मीकरण

**४०.** एखाद्या मुलाचे पुनर्वसन आणि सामाजिक पुनरेकात्मीकरण हे बालगृहात किंवा विशेषगृहात मूल राहत असण्याच्या दरम्यान सुरू होईल आणि मुलाचे पुनर्वसन आणि सामाजिक पुनरेकात्मीकरण (एक) दत्तग्रहण, (दोन) बालक संगोपन, (तीन) पुरस्कृत करणे, आणि (चार) नंतरची जपणूक करणाऱ्या संघटनेकडे मुलाला पाठविणे, अशा पर्यायाद्वारे आळीपाळीने पार पाडता येईल. **पुनर्वसन आणि सामाजिक पुनरेकात्मीकरणाची प्रक्रिया.**

**४१.** (१) मुलाची काळजी घेणे आणि त्याच्या संरक्षणाची तरतूद करणे ही त्याच्या कुटुंबाची प्राथमिक जबाबदारी असेल. **दत्तकग्रहण.**

(२) पोरके झालेल्या, परित्याग केलेल्या, उपेक्षित आणि गैरवापर केलेल्या अशा मुलांच्या पुनर्वसनाकरिता संस्थात्मक आणि बिगर संस्थात्मक मार्गाने दत्तकग्रहणाचा अवलंब करता येईल.

(३) राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या दत्तकग्रहणाबाबतच्या विविध मार्गदर्शक तत्त्वांच्या तरतुदींच्या अनुसार, मंडळास मुलांना दत्तक देण्याचा आणि यासंदर्भात राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार मुलांना दत्तक देतेवेळी, आवश्यक असेल अशी तपासणी करण्याचा अधिकार असेल.

(४) बालगृहे किंवा पोरक्या मुलांसाठी राज्य शासनाद्वारे चालविण्यात येणाऱ्या संस्था यांना पोटकमल (३) खाली देण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार दत्तकग्रहणाकरिता असलेल्या अशा मुलांचे परिनिरक्षण करणारी आणि दत्तक देणारी दत्तकग्रहण अभिकरणे म्हणून ओळखण्यात येईल.

(५) कोणत्याही मुलाला,—

(क) परित्याग केलेल्या मुलाच्या संदर्भात, समितीच्या दोन सदस्यांनी ते मूल दत्तक देण्याकरिता कायद्याने स्वतंत्र असल्याचे घोषित करेपर्यंत,

(ख) स्वाधीन केलेल्या मुलांच्या संदर्भात, पालकांना फेरविचार करण्यासाठी दिलेला दोन महिन्यांचा कालावधी समाप्त होईपर्यंत, आणि

(ग) जे मूल समजू शकते व आपली संमती देऊ शकते अशा मुलाच्या संदर्भात त्याच्या संमतीशिवाय, दत्तक देता येणार नाही.

(६) मंडळ, एखादे मूल—

(क) पिता आणि माता या दोहोंपैकी एकाला, आणि

(ख) जीवित मुलगे आणि मुलींची संख्या जमेस न धरता, ज्या पालकांना एखादे समलिंगी मूल दत्तक घ्यायचे असेल त्यांना दत्तकग्रहण देण्यास मुभा देईल.

बालक संगोपन. **४२.** (१) ज्यांना अंतिमरित्या दत्तक द्यावयाचे आहे त्या अर्भकांना तात्पुरते ठेवण्याकरिता बालक संगोपन ही संज्ञा वापरण्यात येईल.

(२) बालक संगोपनात परिस्थितिनुरुप बालकाला कमी अधिक कालावधीसाठी दुसऱ्या कुटुंबात ठेवण्यात येईल, जेथे मुलाचे स्वःतचे पिता किंवा माता नियमितपणे भेट देऊ शकतील आणि परिणामी पुनर्वसनानंतर ती मुले त्यांच्या स्वतःच्या घरी परत जाऊ शकतील.

(३) राज्य शासनाला मुलांच्या बालक संगोपन कार्यक्रमाच्या योजना पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी नियम करता येतील.

पुरस्कृत करणे. **४३.** (१) मुलांचे जीवनमान सुधारण्याच्या दृष्टीने, त्यांच्या वैद्यकीय, पोषणविषयक, शैक्षणिक आणि मुलांच्या इतर प्रकारच्या गरजा भागविण्यासाठी कुटुंबांना, बालगृहांना आणि विशेष गृहांना पूरक सहाय्य देण्याकरिता पुरस्कृत कार्यक्रमाची तरतूद करता येईल.

(२) राज्य शासनाच्या बालकांसाठी पुरस्कृत विविध योजना, व्यक्तीकडून व्यक्तिगत पुरस्कृत योजना, समूह पुरस्कृत योजना किंवा समाज पुरस्कृत योजना पार पाडण्याच्या प्रयोजनाकरिता नियम करता येतील.

अनुरक्षण संघटना. **४४.** राज्य शासन, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमाद्वारे खालील गोष्टींसाठी तरतूद करू शकेल :—

(क) अनुरक्षण संघटनांची स्थापना किंवा त्यांना मान्यता आणि या अधिनियामाखाली त्यांना पार पाडता येतील अशी कार्ये ;

(ख) बालकांनी किंवा मुलांनी विशेषगृह, बालगृहे सोडल्यानंतर त्यांची काळजी घेण्याच्या प्रयोजनांसाठी आणि त्यांना प्रामाणिक, उद्योगशील व उपयुक्त आयुष्य घालवणे शक्य होण्याच्या प्रयोजनासाठी अशा अनुरक्षण संघटनांनी अनुसरावयाच्या अनुरक्षण कार्यक्रमाची एखादी योजना ;

(ग) प्रत्येक बालकाला किंवा मुलाला, विशेषगृहातून, बालगृहातून मुक्त करण्यापूर्वी त्याच्या संबंधात अशा बालकाच्या किंवा मुलाच्या अनुरक्षणाची आवश्यकता व तिचे स्वरूप, अशा अनुरक्षणाचा कालावधी, त्यावरील देखरेख यासंबंधात परिवीक्षा अधिकाऱ्याद्वारे किंवा, त्या संबंधात त्या शासनाने नियुक्त केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याद्वारे अहवाल तयार करणे किंवा सादर करणे आणि अशा प्रत्येक बालकाच्या किंवा मुलाच्या प्रगतीचा अहवाल परिवीक्षा अधिकाऱ्याने किंवा या प्रयोजनांसाठी नियुक्त केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याद्वारे सादर करणे ;

(घ) अशा अनुरक्षण संघटनांनी राखावयाचा सेवांचा दर्जा व स्वरूप ;

(ङ) बालकाच्या किंवा मुलाच्या अनुरक्षण कार्यक्रमाची योजना राबविण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा इतर बाबी :

परंतु, या कलमान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांद्वारे अशा बालकास किंवा अशा मुलास अनुरक्षण संघटनेत तीन वर्षापेक्षा अधिक काळ ठेवण्याची तरतूद करण्यात येणार नाही :

परंतु, आणखी असे की, एखादे बालक किंवा मूल वयाने सतरा वर्षांपेक्षा अधिक परंतु, अठरा वर्षांपेक्षा कमी वयाचे असेल तर, त्याची वयाची वीस वर्षे होईपर्यंत ते अनुरक्षण संघटनेत राहू शकते.

४५. राज्य शासन, मुलाचे पुनर्वसन आणि सामाजिक पुनरेकात्मीकरण सुलभ करण्यासाठी विभिन्न शासकीय, अशासकीय, निगमित आणि इतर सामाजिक संस्था यांमध्ये प्रभावी सांगड घातली जाण्याची सुनिश्चिती करण्यासाठी नियम करील. सांगड घालणे आणि समन्वय साधणे.

प्रकरण पाच

**संकीर्ण**

४६. या अधिनियमाच्या कोणत्याही तरतूदींन्वये एखाद्या बालकाला किंवा मुलाला ज्याच्यापुढे हजर करण्यात आले असेल असे कोणतेही सक्षम प्राधिकरण, त्याला जेव्हा योग्य वाटेल तेव्हा, त्या बालकाचा किंवा मुलाचा प्रत्यक्ष ताबा असलेल्या किंवा त्यांच्यावर नियंत्रण असलेल्या त्याच्या माता-पित्यास किंवा पालकास त्या बालकाच्या किंवा मुलाच्या संबंधातील कोणत्याही कार्यवाहीच्या वेळी उपस्थित राहण्यास फर्मावू शकेल. **बालकाच्या किंवा मुलाच्या माता-पित्याची अथवा पालकाची उपस्थिती.**

४७. जर एखादी चौकशी चालू असताना, कोणत्याही टप्प्यावर चौकशीच्या प्रयोजनार्थ, बालकाची किंवा मुलाची उपस्थिती आवश्यक नसल्याची सक्षम प्राधिकरणाची खात्री पटली तर, सक्षम प्राधिकरण त्याच्या उपस्थितीशिवाय भागवू शकेल आणि बालकाच्या किंवा मुलाच्या अनुपस्थितीत चौकशीचे काम चालू ठेवू शकेल. **बालकाच्या किंवा मुलाच्या उपस्थितीशिवाय भागवणे.**

४८. (१) या अधिनियमान्वये एखाद्या सक्षम प्राधिकरणापुढे आणलेल्या एखाद्या बालकाला किंवा मुलाला दीर्घकालीन वैद्यकीय उपचारांची आवश्यकता असणारा एखादा रोग झाला असल्याचे अथवा उपचाराला प्रतिसाद देईल अशी एखादी शारीरिक किंवा मानसिक व्याधी त्यास असल्याचे आढळून येईल तेव्हा, सक्षम प्राधिकरण, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांनुसार मान्य ठिकाण म्हणून मान्यता देण्यात आली असेल अशा कोणत्याही ठिकाणी त्या बालकास किंवा मुलाला आवश्यक त्या उपचारासाठी, प्राधिकरणाला आवश्यक वाटेल असा कालावधीसाठी पाठवू शकेल. **घातक रोगाने ग्रस्त असलेल्या बालकाची किंवा मुलाची मान्यताप्राप्त ठिकाणी रवानगी आणि त्याची पुढील व्यवस्था.**

(२) ज्यावेळी एखादे बालक किंवा मूल कुष्ठरोगाने, लैंगिक संक्रामित रोगाने, हिपेटाइटिस " बी " या रोगाने, क्षयरोगाने आणि यासारख्या इतर रोगाने पीडित असल्याचे किंवा विकल मनाचा असल्याचे आढळून येईल तेव्हा, विभिन्न विशेष संदर्भ सेवांमार्फत किंवा अशा संबंधित कायद्यान्वये स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

४९. (१) ज्यावेळी या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीन्वये सक्षम प्राधिकरणापुढे (साक्ष देण्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्यथा) आणण्यात आलेली एखादी व्यक्ती ही बालक आहे किंवा मूल आहे असे त्यास वाटेल त्यावेळी, सक्षम प्राधिकरण त्या व्यक्तीच्या वयासंबंधात रीतसर चौकशी करील आणि त्या प्रयोजनासाठी आवश्यक असेल असा पुरावा घेईल (परंतु शपथपत्र नाही) आणि त्याचे शक्य तितके बरोबर वय नमुद करून ती व्यक्ती बालक किंवा मूल आहे किंवा नाही याबद्दलचा आपला निष्कर्ष अभिलिखित करील. **वयाचा तर्क बांधणे आणि ते निश्चित करणे.**

(२) ज्या व्यक्तीच्या संबंधात आदेश देण्यात आला आहे ती बालक किंवा मूल नसल्याबद्दल नंतर देण्यात आलेल्या कोणत्याही पुराव्यामुळेच केवळ, सक्षम प्राधिकरणाचा कोणताही आदेश अवैध ठरणार नाही आणि सक्षण प्राधिकरणापुढे असा रीतीने आणल्या गेलेल्या व्यक्तीचे, प्राधिकरणाने नमूद केलेले वय हेच या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी त्या व्यक्तीचे खरे वय असल्याचे समजण्यात येईल.

५०. जर एखाद्या बालकाच्या किंवा मुलाच्या बाबतीत ज्या सक्षम प्राधिकरणापुढे त्याला आणण्यात आले असेल त्याच्या अधिकारितेबाहेर त्याचे सर्वसाधारण राहण्याचे ठिकाण असेल तर, सक्षम प्राधिकरण, रीतसर चौकशीनंतर तसे करणे समयोचित आहे अशी त्याची खात्री पटली तर, त्या बालकाला किंवा मुलाला त्याचा नातेवाईक किंवा अन्य व्यक्ती, जी त्याला आपल्या सर्वसाधारण राहण्याच्या ठिकाणी ताब्यात घेण्यास व त्याची योग्य काळजी घेण्यास व त्यावर नियंत्रण ठेवण्यास योग्य व तयार असेल तिच्याकडे—मग असे ठिकाण त्याच्या अधिकारितेबाहेर असले तरीही—परत पाठवू शकेल आणि बालकाला किंवा मुलाला जेथे पाठविण्यात आले असेल त्या ठिकाणी अधिकारितेचा वापर करणाऱ्या सक्षम प्राधिकरणाला, त्यानंतर उद्‌भवणाऱ्या कोणत्याही बाबतीत मूळ आदेश जणू काही त्याने स्वतःच दिला असल्याप्रमाणे, त्या बालकाच्या किंवा मुलाच्या संबंधात तेच अधिकार असतील. **एखाद्या बालकाला किंवा मुलाला अधिकारितेबाहेर पाठविणे.**

५१. सक्षम प्राधिकरणाने विचारात घेतलेला परिवीक्षा अधिकाऱ्याचा किंवा सामाजिक कार्यकर्त्याचा अहवाल गोपनीय समजण्यात येईल ; **अहवाल गोपनीय समजले जाणे.**

परंतु सक्षम प्राधिकरण, त्याला तसे योग्य वाटल्यास, त्यातील सारांश त्या बालकाला किंवा मुलाला किंवा त्याच्या पित्याला किंवा मातेला किंवा पालकाला कळवू शकेल आणि ते, अशा बालकास किंवा मुलास, त्याच्या पित्यास किंवा पालकास अहवालात नमूद केलेल्या बाबीशी संबद्ध असेल असा पुरावा हजर करण्याची संधी देईल.

अपिले. ५२. (१) या कलमाच्या तरतुदींना आधून राहून, सक्षम प्राधिकारणाने या अधिनियमान्वये दिलेल्या एखाद्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला असा आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, सत्र न्यायालयात अपील दाखल करता येईल :

परंतु, अपीलकर्त्याला अपील वेळेवर दाखल करण्यास प्रतिबंध होण्यासारखे पुरेसे कारण होते, अशी सत्र न्यायालयाची खात्री पटल्यास, ते न्यायालयात तीस दिवसांचा उक्त कालावधी संपल्यानंतरही अपील विचारार्थ स्वीकारील.

(२) (क) अपराध केल्याचे अभिकथित असलेल्या बालकाच्या बाबतीत, मंडळाने दिलेल्या दोषमुक्तीच्या कोणत्याही आदेशावर, किंवा

(ख) ती व्यक्ती उपेक्षित बालक नसल्याच्या निष्कर्षासंबंधात समितीने दिलेल्या कोणत्याही आदेशावर, अपील करता येणार नाही.

(३) या कलमान्वये दाखल केलेल्या अपीलात सत्र न्यायालयाने दिलेल्या आदेशावर कोणतेही दुसरे अपील दाखल करता येणार नाही.

पुनरीक्षण. ५३. उच्च न्यायालय कोणत्याही वेळी, एकतर स्वप्रेरणेने किंवा त्याबाबतीत आलेल्या अर्जावरून, ज्या कार्यवाहीमध्ये कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने किंवा सत्र न्यायालयाने एखादा आदेश दिला असेल अशा कोणत्याही कार्यवाहीचा अभिलेख, अशा आदेशाची वैधता किंवा औचित्य याबद्दल स्वतःची खात्री करून घेण्यासाठी मागावू शकेल आणि त्यासंबंधात त्याला योग्य वाटेस असा आदेश देईल :

परंतु, उच्च न्यायालयात, या कलमान्वये कोणत्याही व्यक्तीला स्वतःची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, तिला बाधक असेल असा कोणताही आदेश देणार नाही.

चौकशी,अपीले आणि पुनरीक्षण कार्यवाही यासंबंधातील कार्यपद्धती. ५४. (१) या अधिनियमाद्वारे स्पष्टपणे अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्या खेरीज, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींन्वये कोणतीही चौकशी करतेवेळी, एखादे सक्षम प्राधिकरण, विहित करण्यात येईल अशी कार्यपद्धती अनुसरील आणि तिच्या अधीनतेने, शक्य होईल तेथवर, समन्स खटल्यांच्या संपरीक्षांसाठी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यामध्ये घालून देण्यात आलेली कार्यपद्धती अनुसरील.

(२) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये स्पष्टपणे अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याखेरीज, या अधिनियमान्वये अपिलांची सुनावणी किंवा पुनरीक्षण यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती ही, व्यवहार्य असेल तेथवर, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यांच्या तरतुदीनुसार असेल.

आदेशात सुधारणा करण्याचा अधिकार. ५५. (१) या अधिनियमाखालील अपील व पुनरीक्षण याच्याबाबत असलेल्या तरतुदींना बाध न आणता, कोणतेही सक्षम प्राधिकरण यासंबंधात आलेल्या अर्जानुसार, या अधिनियमान्वये एखाद्या बालकाला किंवा मुलाला ज्या संस्थेत पाठवावयाचे असेल त्या संस्थेच्या संबंधातील किंवा जिच्याकडे काळजी घेण्यासाठी किंवा जिच्या देखरेखीखाली एखाद्या बालकाला किंवा मुलाला पाठवावयाचे असेल त्या व्यक्तीच्या संबंधातील कोणत्याही आदेशात सुधारणा करील :

परंतु, कोणत्याही आदेशाच्या संबंधातील सुधारणेच्या मंजुरी देण्यासाठी सुनावणी चालू असताना, कमीतकमी दोन सदस्य आणि पक्ष किंवा त्यांचे बचाव पक्ष उपस्थित असतील.

(२) एखाद्या सक्षम प्राधिकरणाने दिलेल्या आदेशातील लेखनदोष अथवा कोणताही अभावित चूक किंवा वगळणूक यातून उद्‌भवणारे दोष, सक्षम प्राधिकरण कोणत्याही वेळी, एकतर स्वप्रेरणेने किंवा त्यासंबंधात आलेल्या अर्जावरून सुधारिल.

बालकाला किंवा मुलाला विनादोषरोप सोडण्याचा आणि स्थानांसरित करण्याचा सक्षम प्राधिकरणाचा अधिकार. ५६. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, सक्षम प्रादिकरणाला किंवा स्थानिक प्राधिकरणाला, कोणत्याही वेळी, काळजी घेण्याची आणि संरक्षणाची गरज असलेल्या कोणत्याही मुलाला किंवा कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकाला एकतर बिनशर्त किंवा त्याला लादणे योग्य वाटतील अशा शर्तीवर सोडण्याचा किंवा मुलाचे किंवा बालकाचे सर्वाधिक हित आणि त्याचे राहण्याचे स्वाभाविक ठिकाण या गोष्टी विचारात घेऊन एका बालगृहातून किंवा, यथास्थिति, विशेषगृहातून दुसऱ्या गृहामध्ये स्थानांकरित करण्याचा आदेश देता येईल ;

परंतु, त्या बालकाचा किंवा मुलाचा बालगृहातील किंवा विशेषगृहातील किंवा योग्य संस्था किंवा योग्य व्यक्ती यांच्याकडील वास्तव्याचा एकूण कालावधी हा, अशा स्थानांतरणामुळे वाढविण्यात येणार नाही.

या अधिनियमाखालील बालगृहे आणि भारताच्या निरनिराळ्या भागातील तशाच स्वरूपाची बालगृहे यांच्यातील स्थांनांतरण. ५७. राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण निदेशाद्वारे, कोणत्याही मुलाला किंवा बालकाला अन्य कोणत्याही राज्यातील बालगृहाकडे, विशेषगृहाकडे किंवा तशाच स्वरुपाच्या संस्थेकडे स्थानिक समितीला किंवा, यथास्थिति, मंडळाला तशी पूर्वसूचना देऊन स्थानांतरित करण्यासाठी निदेश देईल आणि असा आदेश, त्या मुलाला किंवा बालकाला ज्या क्षेत्रात पाठवले तेथील सक्षम प्राधिकरणाकरिता प्रभावी आहेत असे समजण्यात येईल.

**५८.** या अधिनियमानुसार एखाद्या विशेषगृहात किंवा बालगृहात किंवा निवारागृहात किंवा संस्थेत ठेवण्यात आलेले कोणतेही बालक किंवा मूल, कुष्ठरोगपीडित किंवा विकल मनाचे आहे किंवा त्यास कोणत्याही अंमली औषधिद्रव्याचे अथवा मन:प्रभावी पदार्थाचे व्यसन जडले आहे, असे ज्यावेळी सक्षम प्राधिकरणाला आढळून येईल त्यावेळी, त्याला एखाद्या कुष्ठरोग्यांच्या आश्रमात किंवा मनोरुग्णालयात किंवा अंमली पदार्थाचे व्यसन जडलेल्यांच्या उपचार केंद्रात किंवा सुरक्षित अभिरक्षेच्या ठिकाणी, सक्षम प्राधिकरणाच्या आदेशान्वये त्याला जेवढ्या कालावधीसाठी तेथे ठेवण्यात फर्मावण्यात आले असेल, अशा कालावधीहून अधिक नसेल इतक्या मुदतीसाठी किंवा त्या बालकांच्या किंवा मुलाच्या योग्य उपचारासाठी वैद्यकीय अधिकाऱ्याकडून आवश्यक म्हणून प्रमाणित करण्यात येईल अशा आणखी पुढील कालावधीसाठी, हलविण्याचा आदेश, ते सक्षम प्राधिकरण देईल. **विकल मनाच्या किंवा कुष्ठरोग पीडित किंवा अंमली पदार्थाचे व्यसन जडलेल्या बालकाचे किंवा मुलाचे स्थानांतरण.**

**५९.** (१) जेव्हा एखाद्या बालकास किंवा मुलास, बालगृहात किंवा विशेषगृहात ठेवण्यात आले असेल, तेव्हा, परिवीक्षा अधिकाऱ्याच्या किंवा सामाजिक कार्यकर्त्याच्या किंवा शासनाच्या किंवा, यथास्थिति, स्वयंसेवी संघटनेच्या अहवालावरून, सक्षम प्राधिकरण, त्या बालकास किंवा मुलास, काही उपयुक्त व्यवसाय किंवा आजीविकेसाठी शिक्षण किंवा प्रशिक्षण देण्याकरिता किंवा त्याच्या पुनर्वसनासाठी, त्याच्यावर देखरेख ठेवण्याकरिता, त्याच्या माता-पित्यांबरोबर किंवा पालकांबरोबर किंवा त्याला स्वीकारण्याची आणि त्याचा ताबा घेण्याची इच्छा असेल, अशा आदेशांमध्ये नाव नमूद केलेल्या कोणत्याही अधिकृत व्यक्तीच्या देखरेखीखाली राहण्याची परवानगी देऊन, सोडून देण्याचा विचार करील. **बालकांस किंवा मुलास ठेवण्याचे स्थान निश्चित झाल्यावर त्यास सोडून देणे किंवा त्याची अनुपस्थिती.**

(२) सक्षम प्राधिकरण, कोणत्याही बालकास किंवा मुलास, परीक्षा, नातेवाईकांचे लग्न, आप्तसंबंधीचा मृत्यू किंवा पित्याचा किंवा मातेचा अपघात किंवा गंभीर आजारपण किंवा या स्वरुपाची कोणतीही आकस्मिक निकड अशा विशेष प्रसंगी, प्रवासात जाण्यायेण्याची वेळ वगळता, जास्तीत जास्त सात दिवसांच्या कालावधीसाठी, पर्यवेक्षणाखाली रजेवर जाण्यासाठी, अनुपस्थित राहण्याची परवानगी मंजूर करील.

(३) जेव्हा परवानगी रद्द करण्यात आली असेल किंवा गमावण्यात आली असेल आणि त्या बालकाने किंवा मुलाने अशा प्रकारे जेथे परत जाण्याचा निदेश देण्यात आला असेल, त्या संबंधित गृहाकडे परत येण्याचे नाकारले असेल किंवा परत येण्यात कसूर केली असेल तेव्हा, मंडळ आवश्यकता वाटल्यास, त्याला परत ताब्यात घेण्याची आणि संबंधित गृहात परत पोहचवण्याची व्यवस्था करील.

(४) या कलमाखाली देण्यात आलेल्या अशा परवानगीनुसार संबंधित गृहामधून किंवा मूल जेवढ्या कालावधीत अनुपस्थित राहिला असेल, तो कालावधी, विशेषगृहामध्ये ज्या कालावधीमध्ये राहण्यासाठी तो पात्र असेल त्याच कालावधीचा एक भाग असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, जेव्हा, एखाद्या बालकाने, परवानगी रद्द करण्यात आल्यावर किंवा गमावण्यात आल्यानंतर, विशेषगृहात परत येण्यात कसूर केली असेल तेव्हा, अशा प्रकारे त्याचा परत येण्यात कसूर झाल्यानंतर लोटलेला कालावधी, त्यास संस्थेत ठेवण्यास पात्र असलेला कालावधी मोजताना वगळण्यात येईल.

**६०.** (१) एखाद्या बालकाला किंवा मुलाला एकाद्या बालगृहात किंवा एखाद्या विशेषगृहात पाठवण्याचा अथवा त्यास एखाद्या योग्य व्यक्तीकडे किंवा योग्य संस्थेकडे काळजी घेण्यासाठी ठेवण्याचा आदेश काढणारे सक्षम प्राधिकरण, त्या बालकाला सांभाळण्याची जबाबदारी असलेल्या माता-पित्यास किंवा अन्य व्यक्तीस, ती तसे करण्यास समर्थ असेल तर, तिच्या उत्पन्नानुसार विहित रीतीने त्या बालकाच्या किंवा मुलाच्या निर्वाहासाठी अंशदान करण्यास फर्मावणारा आदेश काढील. **माता-पित्याकडून अंशदान.**

(२) सक्षम प्राधिकरण, आवश्यकता असल्यास, विहित केले असेल त्याप्रमाणे, बालगृहापासून ते त्याच्या सर्वसाधारण निवासाच्या ठिकाणापर्यंत जाण्यासाठी, सहप्रवासी किंवा माता-पिता किंवा पालक किंवा दोन्हीच्या प्रवासासाठी असा खर्च, गरीब माता-पिता किंवा पालक यांना प्रदान करण्याचा, गृहाच्या अधीक्षकास किंवा प्रकल्प व्यवस्तापकास निदेश देईल.

**६१.** (१) या अधिनियमान्वये ज्या बालकांवर किंवा मुलांवर कार्यवाही करण्यात येते त्यांच्या कल्याणासाठी व पुनर्वसनासाठी, राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण, त्यास योग्य वाटेल अशा नावाचा एक निधी निर्माण करील. **निधी.**

(२) कोणत्याही व्यक्तीने किंवा संघटनेने स्वेच्छेने दिलेल्या अशा देणग्या, अंशदाने किंवा वर्गण्या या निधीमध्ये जमा करण्यात येतील.

(३) पोटकलम (१) अन्वये उभारण्यात आलेल्या निधीचे प्रशासन, राज्य सल्लागार मंडळाकडून विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा प्रयोजनांसाठी करण्यात येईल.

**६२.** (१) केंद्र सरकार किंवा राज्य शासन, गृहांची स्थापना करणे, व त्यांचे परिक्षण करणे, साधनसंपत्ती उभारणे, काळजी घेण्याची व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांचे आणि कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकाचे शिक्षण प्रशिक्षण व पुनर्वसन करण्यासाठी सोयी पुरवणे व संबंधित निरनिराळ्या शासकीय व अशासकीय अभिकरणांमध्ये समन्वय साधणे, यांच्याशी संबंधित बाबींवर त्या शासनाला सल्ला देण्यासाठी केंद्रीय किंवा, यथास्थिति, राज्य सल्लागार मंडळ, घटित करील. केंद्रीय, राज्य, जिल्हा आणि शहर सल्लागार मंडळे.

(२) केंद्रीय किंवा राज्य सल्लागार मंडळ हे, केंद्र सरकारला किंवा, यथास्थिति, राज्य शासनाला, योग्य वाटतील अशा व्यक्तींचे त्यात, प्रख्यात सामाजिक कार्यकर्ते, बाल-कल्याण विषयक निर्गमित क्षेत्रातील स्वयंसेवी संघटनेचे प्रतिनिधी, शिक्षण तज्ज्ञ, वैद्यकीय व्यवसायिक आणि राज्य शासनाचा संबंधित विभाग याचा समावेश असेल.

(३) या अधिनियमाच्या कलम ३५ खाली घटित केलेली जिल्हा किंवा शहर पातळीवरील निरीक्षण समिती जिल्हा किंवा शहर सल्लागार मंडळ म्हणूनही काम करील.

**बालकांसाठी विशेष पोलीस पथक.**

**६३.** (१) जे या अधिनियमाखाली, बालकांच्या संबंधातील, प्रकरणे वारंवार किंवा केवळ त्यांच्या बाबतीतीलच प्रकरणे हाताळतात किंवा जे बालकांना किंवा मुलांना बालगुन्ह्यांपासून प्रतिबंध करण्याच्या कामात मुख्यतः गुंतलेले असतात किंवा त्यांना हाताळण्यात गुंतलेले असतात, अशा पोलीस अधिकाऱ्यांना, त्यांची कर्तव्ये अधिक प्रभाविपणे पार पाडणे शक्य व्हावे या हेतूने, त्यांना विशेषीकृत शिक्षण आणि प्रशिक्षण देण्यात येईल.

(२) प्रत्येक पोलीस ठाण्यात नैपुण्य आणि यथोचित प्रशिक्षण व दिशा निदेशन असलेला किमान एक अधिकारी " बालके किंवा मुलांचा कल्याण अधिकारी " म्हणून पदनिर्देशित करण्यात येईल, जो पोलिसांशी समन्वय साधून बालकांची किंवा मुलांची प्रकरणे हाताळतील.

(३) बालकांना किंवा मुलांना हाताळणारे, उपरोक्तप्रमाणे पदनिर्देशित केलेले सर्व पोलीस अधिकारी ज्याचे सदस्य असतील असे बालकांसाठी विशेष पोलीस पथक, बालकांशी व मुलांशी होत असलेल्या पोलिसांच्या व्यवहारात समन्वय साधण्यासाठी व त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी, प्रत्येक जिल्ह्यात आणि शहरात तयार करण्यात येईल.

**या अधिनियमाच्या प्रारंभी शिक्षा भोगत असलेले कायद्याशी संघर्ष करीत असलेले बालक.**

**६४.** हा अधिनियम अंमलात आणला असेल अशा कोणत्याही क्षेत्रात, राज्य शासनाला किंवा स्थानिक प्राधिकरणाला असा निदेश देता येईल की, या अधिनियमाच्या प्रारंभी कारावासाची कोणतीही शिक्षा भोगत असलेल्या कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या बालकाला, अशी शिक्षा भोगायला लावण्याऐवजी, त्याच्या शिक्षेच्या उर्वरित कालावधीसाठी, राज्य शासनास किंवा स्थानिक प्राधिकरणास योग्य वाटेल अशा रीतीने, एखाद्या विशेषगृहात पाठविण्यात यावे किंवा योग्य संस्थेत ठेवण्यात यावे आणि जणू काही मंडळाकडून, त्या बालकास अशा विशेषगृहात किंवा संस्थेत पाठविण्याचा आदेश देण्यात आल्याप्रमाणे किंवा, यथास्थिति, या अधिनियमाच्या कलम १६ च्या पोटकलम (२) खालील संरक्षक देखरेखीखाली ठेवण्याचा आदेश दिला असल्याप्रमाणे, या अधिनियमाच्या तरतुदी त्या बालकास लागू होतील.

**बंधपत्रासंबंधीची कार्यपद्धती.**

**६५.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या प्रकरण तेहतीसच्या तरतुदी शक्य होतील तेथवर, या अधिनियमान्वये घेण्यात आलेल्या बंधपत्रांना लागू होतील.

**अधीकारांचे प्रत्येयोजन.**

**६६.** राज्य शासनाला, सर्वसाधारण आदेशाद्वारे, असा निदेश देता येईल की, अधिनियमान्वये त्याच्याकडून वापरण्याजोगा असलेला कोणताही अधिकार, त्या आदेशात विहित करण्यात येईल अशा परिस्थितीत आणि जर काही शर्ती असल्यास त्यानुसार, त्या शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या अधीन असलेल्या एखाद्या अधिकाऱ्याकडून देखील वापरला जाईल.

**सद्‌भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.**

**६७.** या अधिनियमान्वये किंवा त्याखाली करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा आदेश यांच्या अनुसार सद्‌भावपूर्वक करण्यात आलेल्या किंवा करणे उद्देशित असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल राज्य शासनाच्या किंवा बालगृह चालविणाऱ्या स्वयंसेवी संघटनेच्या किंवा या अधिनियमान्वये नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्याविरुद्ध किंवा कर्मचाऱ्याच्याविरूद्ध कोणताही दावा किंवा वैध कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**नियम करण्याचा अधीकार.**

**६८.** (१) राज्य शासनाला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येईल.

(२) विशेषतः आणि पूर्ववर्ती अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, असे नियम पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करू शकतील, त्या अशा :—

(एक) मंडळाच्या सदस्यांच्या पदावधी आणि कलम ४ च्या पोटकलम (४) अन्वये ज्या रितीने असे सदस्य राजीनामा देऊ शकतील ती रीत ;

(दोन) मंडळाच्या बैठकींच्या वेळा आणि कलम ५ च्या पोटकलम (१) अन्वये त्याच्या बैठकीत कामकाज करण्यासंबंधातील कार्यपद्धतीचे नियम ;

(तीन) अभीक्षण गृहाचे व्यवस्थापन तसेच गृहांकडून पुरविण्यात येणाऱ्या सेवांचा दर्जा आणि सेवेचे विविध प्रकार आणि ज्या परिस्थितीत आणि ज्या रितीने, तिला अभीक्षण गृहांचे प्रामाणन देता येईल किंवा काढून घेता येईल, ती परिस्थिती व ती रीत आणि कलम ८ मध्ये निर्देशित केल्या असतील अशा इतर बाबी ;

एच

(चार) विशेषगृहांचे व्यवस्थापन आणि तसेच विशेषगृहांकडून पुरविण्यात येणाऱ्या सेवांचा दर्जा व सेवेचे विविध प्रकार आणि ज्या परिस्थितीत आणि ज्या रीतीने, त्यांना विशेषगृह म्हणून प्रमाणन देता येईल किंवा काढून घेता येईल, ती परिस्थिती व ती रीत व कलम ९ मध्ये निर्देशित केल्या असतील अशा इतर बाबी ;

(पाच) कायद्याशी संघर्ष करीत असलेले कोणतेही बालक म्हणून ज्या कोणत्याही व्यक्तीला मंडळासमोर सादर करता येईल ती व्यक्ती आणि कलम १० च्या पोटकलम (२) अन्वये अशा बालकास अभिक्षण गृहाकडे पाठविण्याची रीत ;

(सहा) कलम १९ खालील बालकाच्या अपराधसिद्धीशी संबंधित निरर्हता दूर करण्यासंबंधातील बाबी ;

(सात) अध्यक्षपदीय व्यक्ती आणि सदस्य यांची अर्हता आणि कलम २९ चे पोटकलम (३) अन्वये ज्या कालावधीसाठी त्यांची नियुक्ती करता येऊ शकेल तो पदावधी ;

(आठ) समितीच्या बैठकीची वेळ आणि कलम ३० च्या पोटकलम (१) अन्वये तिच्या बैठकींमध्ये कामकाज पार पाडण्यासंबंधातील कार्यपद्धतीचे नियम ;

(नऊ) पोलिसांकडे आणि समितीकडे अहवाल सादर करण्याची रीत आणि कलम ३२ चे पोटकलम (२) अन्वये चौकशी प्रलंबित असेपर्यंत मुलास बालगृहाकडे पाठविण्याची व सोपविण्याची रीत ;

(दहा) बालगृहांचे व्यवस्थापन आणि तसेच बालगृहाकडून पुरविण्यात येणाऱ्या सेवांचा दर्जा आणि त्यांचे स्वरुप आणि तसेच कलम ३४ च्या पोटकलम (२) अन्वये बालगृहाचे किंवा स्वयंसेवी संघटना म्हणून मान्यता दिल्याचे प्रमाणन ज्या रीतीने देता येईल किंवा काढून घेता येईल ती रीत ;

(अकरा) बालगृहांकरिता निरीक्षण समित्यांची नियुक्ती, त्यांचा पदावधी व ज्या प्रयोजनांकरिता निरीक्षण समित्यांची नियुक्ती करता येईल ती प्रयोजने आणि कलम ३५ मध्ये निर्देश केलेल्या असतील अशा इतर बाबी ;

(बारा) कलम ३७ च्या पोटकलम (३) अन्वये निवारागृहांकडून पुरवावयाच्या सुविधा ;

(तेरा) कलम ४२ च्या पोटकलम (३) अन्वये मुलांच्या बालक संगोपन कार्यक्रमाची योजना राबविणे ;

(चौदा) कलम ४३ च्या पोटकलम (२) खाली मुलांसाठी पुरस्कृत केलेल्या विविध योजना राबविणे ;

(पंधरा) कलम ४४ खालील, अनुरक्षण संघटनेशी संबंधित बाबी ;

(सोळा) कलम ४५ खालील मुलांचे पुनर्वसन व सामाजिक एकात्मता सुकर करण्यासाठी विभिन्न अभिकरणांमध्ये प्रभावीपणे सांगड घातली जाणे सुनिश्चित करणे ;

(सतरा) कलम ६१ च्या पोटकलम (३) खालील निधीची व्यवस्था ज्या प्रयोजनांसाठी व ज्या रीतीने पाहता येईल, ती प्रयोजने व ती रीत ;

(अठरा) जी विहित करणे आवश्यक आहे किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब ;

(३) राज्य शासनाने या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, ते करण्यात आल्यानंतर, शक्य होईल तितक्या लवकर त्या राज्याच्या विधानमंडळासमोर ठेवण्यात येईल.

**६९.** (१) बाल न्याय अधिनियम, १९८६ (१९८६ चा ५३) हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. **निरसन व व्यावृत्ती.**

(२) असे निरसन झाले असले तरीही, उक्त अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कारवाई ही या अधिनियमाच्या तत्सम तरतुदीमध्ये केलेली गोष्ट किंवा केलेली कोणतीही कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

**७०.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, केंद्र सरकारला या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसणाऱ्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करता येईल : **अडचणी दूर करण्याचा अधिकार.**

परंतु, असा कोणताही आदेश, या अधिनियमाच्या प्रारंभापासून दोन वर्षाच्या कालावधीसाठी समाप्त झाल्यानंतर, काढता येणार नाही.

(२) तथापि, या कलमाखाली काढलेला आदेश, तो काढण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

## THE JUVENILE JUSTICE (CARE AND PROTECTION OF CHILDREN) ACT, 2000

## बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०००

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| abode | वसतिस्थान | [sec. 2 (d) (i)] |
| act and omission | कृती-अकृती | [sec. 28] |
| adoption | दत्तकग्रहण | [sec. 40] |
| after care organisation | अनुरक्षण संघटन | [sec. 44 (m.n.)] |
| alleged | अभिकथित | [sec. 2 (l)] |
| alms | भीक | [sec. 2 (b)(1)] |
| assault | हमला | [sec. 23] |
| calling | आजीविका | [sec. 59 (1)] |
| certification | प्रमाणंन | [sec. 34 (2)] |
| child of same sex | समलिंगी मूल | [sec. 41 (6)(b)] |
| child psychology | बाल-मानसशास्त्र | [[sec. 4(3)] |
| children's homes | बालगृहे | [sec. 34] |
| child welfare committee | बाल-कल्याण समिती | [sec. 29 (1)] |
| circumstances | परिस्थिती | [sec. 42 (2)] |
| commotion | विक्षोम | [sec. 2 (d)(ix)] |
| competent authority | सक्षम प्राधिकरण | [sec. 2 (g)] |
| consistent with | —शी सुसंगत | [sec. 10 (2)] |
| constituted | घटित | [sec. 31 (2)] |
| contribute | अंशदान | [sec. 60 (1)] |
| convention | अभिसंधी | [Preamble] |
| deformity | व्यंग | [sec. 2 (b)(ii)] |
| disqualification | निरर्हता | [sec. 19 (1)] |
| emergency | आकस्मिक निकड | [sec. 59 (2)] |
| evaluation | मूल्यमापन | [sec. 36] |
| exclusive | अनन्य | [sec. 31 (2)] |
| facilitate | सुकर करणे | [sec. 68 (2) (xvi)] |
| friendly approach | मैत्रीपूर्ण दृष्टिकोन | [Preamble] |
| group counselling | समूह समुपदेशन | [sec. 15 (1) (b)] |
| hazardour | जोखमीचा | [sec. 26] |
| injury | इजा | [sec. 2 (b)(ii)] |

| | | |
|---|---|---|
| instrument | विलेख | [Preamble] |
| invalid | विधिअग्राह्य | [sec. 5 (3)] |
| judicial proceedings | न्यायिक कार्यवाही | [Preamble] |
| juvenile or the child welfare officer | बालके किंवा मुलांचा कल्याण अधिकारी | [sec. 68 (2) (vi)] |
| likelihood | शक्यता | [sec. 2 (d) (ii) (a)] |
| monitoring | संनियंत्रण | [sec. 36] |
| nutritional | पोषणविषयक | [sec. 43] |
| observation home | अभीक्षण गृह | [sec. 2 (o)] |
| on one's own motion | स्वप्रेरणेने | [sec. 55(2)] |
| orientation | दिशानिदेशन | [sec 63 (2)] |
| ostensibly | १. सकृतदर्शनी | [sec. 33 (3)] |
| | २. वरकरणी | [sec. 26] |
| pretence | बहाणा | [sec. 2 (b)(i)] |
| probation officer | परिवीक्षा अधिकारी | [sec. 2 (s)] |
| public spirited | लोकहितैषी | [sec. 32 (1)(iv)] |
| reasonable | वाजवी | [sec. 2(d) (ii)(a)] |
| recorded | अभिलिखित | [sec. 21 (Proviso)] |
| re-enacted | पुनरअधिनियमीत | [Preamble] |
| reintegration | १. पुनरेकात्मता | [Preamble] |
| | २. पुनरेकात्मीकरण | [sec. 40] |
| relevant | संबद्ध | [sec. 19 (2)] |
| re-socialisation | पुनर्सामाजिकीकरण | [sec. 9 (3)] |
| restoration | पुनःस्थापना | [sec. 39 (m.n.)] |
| sexually trasmitted disease | लैंगिक संक्रामित रोग | [sec. 48 (2)] |
| shelter home | निवारा गृह | [sec. 2 (u)] |
| social integration | सामाजिक ऐक्य | [sec. 8(3)] |
| sore | क्षत | [sec. (b) (ii)] |
| special home | विशेष गृह | [sec. 59 (4)] |
| trafficking | अपव्यापार | [sec. 2 (d) (vii)] |
| trial | संपरीक्षा | [sec. 18 (1)] |
| unconscionable | गैरवाजवी | [sec. 2 (d)(viii)] |
| well-being | क्षेम | [sec. 15 (3) (Proviso)] |
| willing | स्वेच्छापूर्वक | [sec. 2 (q)] |
| wound | जखम | [sec. 2 (b)(ii)] |

## बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०००

## THE JUVENILE JUSTICE (CARE AND PROTECTION OF CHILDREN) ACT, 2000

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अनन्य | exclusive | [क. ३१ (२)] |
| अनुरक्षण संघटन | After care organisation | [क. ३१ (स. टी.)] |
| अपव्यापार | trafficking | [क. २ (घ) (सात)] |
| अभिकथित | alleged | [क. २ (ठ)] |
| अभिलिखित | recorded | [क. २१ (परंतुक)] |
| अभिसंधी | convention | [उद्देशिका] |
| अभीक्षण गृह | observation home | [क. २ (ण)] |
| आकस्मिक निकड | emergency | [क. ५९ (२)] |
| आजीविका | calling | [क. ५९ (१) ] |
| इजा | injury | [क. २ ख (दोन)] |
| अंशदान | contribute | [क. ६० (१)] |
| कृती-अकृती | act and omission | [क. २८] |
| गैरवाजवी | unconscionable | [क. २ (घ) (आठ)] |
| घटित | constituted | [क. ३१ (२) ] |
| जखम | wound | [क. २ (ख) (दोन)] |
| जोखमीचा | hazardous | [क. २६] |
| दत्तकग्रहण | adoption | [क. ४०] |
| दिशानिदेशन | orientation | [क. ६३ (२)] |
| निरर्हता | disqualification | [क..१९ (१) ] |
| निवारा गृह | shelter home | [क. २ (प)] |
| परित्याग | abandon | [क. २ (घ) (पाच)] |
| परिस्थिती | circumstances | [क. ४२ (२)] |
| परिवीक्षा अधिकारी | probation officer | [क. २ (ध)] |
| पुनरअधिनियमित | re-enacted | [उद्देशिका] |
| पुनरेकात्मता | reintegration | [उद्देशिका] |
| पुनरेकात्मीकरण | reintegration | [क. ४०] |
| पुनर्सामाजिकीकरण | re-socialisation | [क. ९ (३)] |
| पुनःस्थापना | restoration | [क. ३९ (स.टी.)] |
| पोषण विषयक | nutritional | [क. ४३] |
| प्रमाणन | certification | [क. ३४ (२)] |
| बहाणा | pretence | [क. २ (ख) (एक)] |
| बाल कल्याण समिती | child welfare committee | [क. २९ (१)] |

| | | |
|---|---|---|
| बालके किंवा मुलांचा कल्याण अधिकारी | Juvenile or the child welfare officer | [क. ६८ (२) (सहा)] |
| बालगृहे | children's homes | [क. ३४] |
| बाल-मानसशास्त्र | child psychology | [क.४ (३)] |
| भीक | alms | [क. २ (ख) (एक)] |
| मूल्यमापन | evaluation | [क. ३६] |
| मैत्रीपूर्ण दृष्टिकोन | friendly approach | [उद्देशिका] |
| न्यायिक कार्यवाही | judicial proceedings | [उद्देशिका] |
| लैंगिक संक्रमित रोग | sexually transmitted disease | [क. ४८ (२)] |
| लोकहितैषी | public spirited | [क. ३२ (१) (चार)] |
| वरकरणी | ostensibly | [क. २६] |
| वसतिस्थान | abode | [क. २ (घ) (एक)] |
| वाजवी | reasonable | [क. २ (घ) (दोन) (क)] |
| विलेख | instrument | [उद्देशिका] |
| विशेषगृह | special home | [क. ५९ (४)] |
| विधीअग्राह्य | invalid | [क. ५(३)] |
| विक्षोम | commotion | [क. २ (घ) (नऊ)] |
| व्यंग | deformity | [क. २ (ख) (दोन) ] |
| शक्यता | likelihood | [क. २ (घ) (दोन) (क)] |
| —शी सुसंगत | consistent with | [क. १० (२)] |
| सकृत्दर्शनी | ostensibly | [क. ३३ (३] |
| समलिंगी मूल | child of same sex | [क. ४१ (६) (ख) ] |
| समूह समुपदेशन | group counselling | [क. १५ (१) (ख)] |
| समक्ष प्राधिकरण | competent authority | [क. २ (छ)] |
| सामाजिक ऐक्य | sodial integration | [क. ८ (३)] |
| सुकर करणे | facilitate | [क. ६८ (२) (सोळा)] |
| संनियंत्रण | monitoring | [क. ३६] |
| संपरीक्षा | trial | [क. १८ (१)] |
| संबद्ध | relevant | [क. १९ (२)] |
| स्वप्रेरणेने | on one's own motion | [क. ५५ (२)] |
| स्वेच्छापूर्वक | willing | [क. २ (थ)] |
| हमला | assault | [क. २३] |
| क्षत | sore | [क. २ (ख) (दोन)] |
| क्षेम | well-being | [क. १५ (३) (परंतुक)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई